
www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज
दैनिक युवक आधार मराठी

दै. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 205 वा गुरुवार दि. १० एप्रिल २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514




# तहव्वूर राणा प्रत्यार्पण: हालचालींना वेग; अजित डोवाल-जयशंकर यांनी घेतली अमित शाह यांची भेट



२६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाईंड तहव्वूर राणाला लवकरच भारतात आणण्याची शक्यता आहे. भारतात प्रत्यार्पणाला स्थगिती देण्याबाबत अमेरिकेच्या न्यायालयात केलेला अर्ज फेटाळण्यात आला आहे. यानंतर आता राणाच्या प्रत्यार्पणासाठी भारतातील अनेक तपास यंत्रणाची पथके अमेरिकेत दाखल झाली आहेत. लवकरच तहव्वूर राणाला भारतात आणले जाणार आहे. या पार्श्वभूमीवर भारतातील हालचालींना वेग आला आहे. भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतल्याची माहिती मिळाली आहे. तहव्वूर राणाच्या भारतातील प्रत्यार्पणाबाबत गेल्या अनेक वर्षांपासून प्रयत्न सुरू होते. दीर्घ काळापासून भारत तहव्वूर राणाच्या प्रत्यार्पणाची मागणी करत होता. अखेर पंतप्रधान नरेंद्र मोदी ट्रम्प यांच्या भेटीला गेले असता या दोन्ही नेत्यांच्या बैठकीत अमेरिकेने ही मागणी मान्य केली. परंतु, राणाने प्रत्यार्पणाविरोधात अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करत याला स्थगिती देण्याची मागणी केली होती. परंतु, ही याचिका फेटाळण्यात आली. आरोपी तहव्वूर राणा सध्या लॉस एंजेलिसच्या जेलमध्ये बंद आहे. त्याला भारतात आणणार असून त्या पार्श्वभूमीवर दिल्ली आणि मुंबईतील सुरक्षा वाढवण्यात आली आहे.

**अजित डोवाल-जयशंकर यांनी घेतली अमित शाह यांची भेट**

तहव्वूर राणाला भारतात आणण्याच्या पार्श्वभूमीवर दिल्लीतील नॉर्थ ब्लॉक येथे असलेल्या गृह मंत्रालयाच्या कार्यालयात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांची एक महत्त्वाची बैठक पार पडली. ही बैठक सुमारे २२ मिनिटे चालल्याची माहिती मिळाली आहे. या बैठकीत तहव्वूर राणाचे प्रत्यार्पण आणि त्यासंदर्भातील राजकीय परिणामांबाबत चर्चा करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, तहव्वूर राणा आयएसआय आणि लष्कर ए तोयबाचा सदस्य आहे. राणा हा डेविड हेडलीचा खास मानला जात होता. हल्ल्याअगोदर तहव्वूर आणि हेडली यांची अनेकदा बैठक झाली. डेविड हेडलीने अमेरिकन तपास यंत्रणेसमोर तहव्वूरचं नाव घेतले होते. हेडली मुंबई हल्ल्याआधीच भारतात आला होता. त्याने मुंबईतील ताज हॉटेल, लियोपोल्ड कॅफेसह अन्य प्रमुख जागांची रेकी केली होती. त्यानंतर आयएसआय आणि पाकिस्तानी सैन्याद्वारे प्रशिक्षण दिलेले लष्कर ए तोयबाचे दहशतवादी मुंबईत शिरले आणि त्यांनी ताज हॉटेलसह इतर ठिकाणांवर हल्ले केले. मुंबईतील दहशतवादी हल्ल्याबाबत तहव्वूरला आधीच माहिती होती. २००८ च्या दहशतवादी हल्ल्याच्या आरोपपत्रानुसार, २६ नोव्हेंबरच्या हल्ल्यापूर्वी मुंबईतील पवई इथल्या हॉटेलमध्ये २ दिवस राणा थांबला होता. ११ नोव्हेंबर २००८ रोजी तहव्वूर राणा भारतात आला, तो २१ नोव्हेंबरपर्यंत इथेच होता. त्यात २ दिवस मुंबईतील पवई भागात थांबला होता.

## द•ख•ल

### ..नळदुर्ग शहरात संविधान चौकात श्री. प्रभू रामचंद्राच्या प्रतिमेचे पूजन शिवसेनेच्या वतीने करण्यात आले..

**दैनिक युवक आधार -**
**संतोष पुदाले**
**तुळजापूर धाराशिव**



संपूर्ण देशभरात रामनवमी जल्लोष साजरा होत असताना त्यात अनुषंगाने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या वतीने दि.६ एप्रिल रोजी नळदुर्ग येथील संविधान चौकात रामनवमीनिमित्त शिवसेनेच्या वतीने श्री. प्रभू रामचंद्राच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले यावेळी अणदूर येथून श्री. प्रभू रामचंद्र भक्ताच्या वतीने भव्य दिव्य मूर्ती व पालखी मिरवणूक संविधान चौकात आल्यावर फटाके वाजवून मूर्तीचे पूजन करण्यात आले यावेळी नळदुर्ग शहर प्रमुख संतोष पुदाले उपशहरप्रमुख शाम कनकधर सोमनाथ म्हेत्रे युवा सेना शहर प्रमुख नेताजी महाबोले यांच्या हस्ते मूर्तीचे पूजन करण्यात आल्यानंतर पालखी मिरवणूक रामतीर्थ मंदिराकडे घोषणा देत मार्गस्थ झाली यावेळी शंकर चौहान शिरीष डुकरे राहुल गायकवाड आकाश मेंडके अंबोजी विभोते शंकर विभोते व सर्व राम भक्त उपस्थित होते

### महाआदीशक्ति एज्युकेशन अँड चॅरिटेबल ट्रस्ट ने राम नवमीचे निमित्त साधून बालगोपाळांसाठी एका प्रश्न मंजुषेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**



महाआदीशक्ति एज्युकेशन अँड चॅरिटेबल ट्रस्ट ने राम नवमीचे निमित्त साधून बालगोपाळांसाठी एका प्रश्न मंजुषेचे आयोजन केले होते हा कार्यक्रम राम मंदिर बोळींज विरार पश्चिम येथे घेण्यात आला या कार्यक्रमात लहान मुलांना रामा बदल प्रश्न विचारण्यात आले तसेच त्यांना प्रभु श्री राम आणि हिंदू धर्माची माहिती देत पारितोषिकेही देण्यात आली या वेळी विद्यार्थ्यांना शालेय वस्तू वाटप करण्यात आले हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात व श्री रामाच्या जल्लोषात साजरी करण्यात आला या वेळी ट्रस्ट चे अध्यक्ष सोशल मीडिया प्रमुख गौरव संजीव कलांगण, कार्याध्यक्ष वैभव खेडेकर , सभासद विनोद नायर,सुरज जुजुम, दिपक मिश्रा, सिमा काळे समाजसेविका आदि पदाधिकारी उपस्थित होते त्याच प्रमाणे राम मंदिराचे पदाधिकारी अध्यक्ष किरण राऊत,उपाध्यक्ष हर्षल म्हात्रे,अजय बोळिंजकर, प्रविण नाईक आदि पदाधिकारी उपस्थित होते

## पारंपारिक वारसा जपत दादर गावात भरते जत्रा

**दैनिक युवक आधार**
**उरण प्रतिनिधी /हेमाली पाटील**
**दि. 09 एप्रिल**



पेण तालुक्यातील नेहमीच चर्चेत असणाऱ्या दादर गावात दिनांक 07 व 08 एप्रिल रोजी भव्य दिव्य अशी जत्रा संपन्न झाली. आई गावदेवी माता व बहिरीदेव महाराजांची जत्रा दरवर्षी दादर गावात भरली जाते.सारे भक्तगण वर्षभर या दिवसाची आतुरतेने वाट पाहत असतात. चैत्र शुद्ध दशमी च्या मंगलमय दिनी गावदेवी मातेला व कालभैरव देवाला मानपान देऊन सर्व ग्रामस्थ इडा पिडा टळण्यासाठी देवीला साकडं घालतात. बहिरीदेवाचा लेपा (पालखी ) ढोल ताशाच्या गजरात, गुलाल उडवीत गावभर फिरवली जातात. घरोघरी पालखीचे आगमन होते. गावकरी मोठ्या आनंदाने स्वागत करत असतात. या दादर गावात कमीत कमी वीस ते पंचवीस लहान मोठी सर्व देव देवतांची मंदिरे आहेत. प्रत्येक आळीत मंदिर असल्याकारणाने घरोघरी स्पिकरच्या माध्यमाने लहान मोठी मंडळी नाचत असतात. संपूर्ण गाव भक्तिमय आवाजात दुमदुमत होता. विविध प्रकारची दुकाने,पाळणी, खाऊची दुकाने विद्युत रोषणाई, पाहुणे, गावकरी या साऱ्यांनी जत्रा सजलेली होती.तरुण मुला-मुलींची अफाट गर्दी पाहायला मिळाली. पेण तालुक्यातील दादर हे लोकसंख्येच्या दृष्टीने मोठं गाव आहे. समुद्राच्या खाडीवर आपले उदरनिर्वाह करणारे हे ग्रामस्थ कष्टकरी, शेतकरी आहेत. पुर्वी उत्पन्नाचे साधन म्हणून येथील रहिवाशी रेतीचा व्यवसाय (मचवा )करत. आजही काही लोक या पारंपारीक व्यवसायाला आपले दैवत मानतात.आणि म्हणूनच पिढ्यानपिढ्या चालत आलेली परंपरा येथील जनतेने आपल्या पोशाखातून दर्शवली. जत्रेच्या निमित्ताने सर्व मुले, पुरुष, वृद्ध कमरेला रुमाल, डोक्यावर कान टोपी आणि टीशर्ट घालतात. तर मुली, स्त्रिया दागदागिने घालून तयार असतात. शिक्षण घेऊन नोकरी निमित्त बाहेर गावी स्थायिक झालेले दादरकर मूळ गावी येऊन आपला आनंद साजरा करतात.अशी माहिती येथील सुजाण नागरिक सौ. सोनाली पाटील व अलंकार पाटील या दाम्पत्यानी दिली.

## शेतकरी कामगार पक्ष पुरस्कृत वाकडी येथे टेनिस क्रिकेट सामने प्रकाश झोतात संपन्न झाले

**दैनिक युवक आधार**
**सुरेश भोईर( कार्यकारी संपादक )**

दिनांक ८ एप्रिल २०२५ रोजी पनवेल येथील वाकडी गावात शेतकरी कामगार पक्ष पुरस्कृत पनवेलचे माजी उपसभापती व पनवेल तालुका चिटणीस राजेश केणी यांचा माध्यमातून टेनिस क्रिकेट सामने आयोजित केले होते.या सामन्यांचे उदघाटक शेतकरी कामगार पक्षाचे माजी.आमदार बाळाराम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी त्यांनी आपले विचार मांडले. पूर्वी कबड्डी आणि इतर क्रीडाप्रकार होते परंतु आता क्रिकेट हा व्यवसायिक आणि सगळ्या दृष्टीने महत्त्वाचा खेळ झालेला आहे, त्यामुळे युवकांना प्रेरणा देणारा त्यांना चांगलं भविष्य देणारा असा हा क्रीडा प्रकार आहे आणि या क्रीडा प्रकाराचा आपल्याकडे चांगला लाभ सगळ्यांनी घ्यावा असं मला वाटते असे मत आमदार बाळाराम पाटील यांनी मांडले. या प्रसंगी उपस्थित पनवेल विधानसभा अध्यक्ष काशिनाथ पाटील,जिल्हा परिषद सदस्य विलास फडके,शिवकर ग्रामपंचायत माजी सरपंच अनिल ढवळे दूंदरे ग्रामपंचायत सरपंच सुभाष भोपी,उद्योजक संजय गवळी,वकील गायकर कामगार नेते रवींद्र शेळके चिंचवली पोलीस,पाटील, महादू पाटील,पारस मसालाचे संचालक विष्णू शेळके,विठ्ठल पाटील ग्रामपंचायत माजी सदस्य बाळाराम गवळी,अर्जुन पाटील,लहू शेळके,हरीश शेळके,कैलास भोपी, रायगड भूषण महादेव गायकर,रीटघर ग्रामपंचायत माजी सरपंच भारत भोपी अदिसह मान्यवर व क्रीडाप्रेमी उपस्थित होते





## सिल्लोडचे मालेगाव होऊ देणार नाही - किरीट सोमय्या.

### उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण यांच्या राजकीय गॉडफादरलाही सोडणार नाही

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**



**सिल्लोड :-** माजी खासदार किरीट सोमय्या यांनी मंगळवार रोजी सिल्लोड येथे येऊन पोलिसांना ११२ नागरिकांचे जन्म मृत्यू प्रमाणपत्र साठी दिलेल्या बोगस कागदपत्रांचे पुरावे सादर केले. या बोगस प्रमाणपत्र वाटपात अधिकाऱ्यांसह त्यांच्या आकाचाही लवकरच बंदोबस्त करणार असल्याचे त्यांनी यावेळी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

सिल्लोड तालुक्यात उपविभागीय अधिकारी कार्यालय व नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने ४७०० नागरिकांना जन्म मृत्यू प्रमाणपत्र वाटप करण्यात आले होते. या प्रमाणपत्राबाबत आक्षेप नोंदवून तीन महिन्यांत सोमय्या हे सिल्लोड येथे मंगळवारी चौथ्यांदा आले.


त्यांनी शहर पोलीस ठाण्यात उपविभागीय पोलीस अधिकारी डॉक्टर दिनेश कुमार कोल्हे यांचे सोबत एक तास चर्चा केली. यावेळी त्यांनी पोलिसांना ११२ जन्म प्रमाणपत्र घेतलेल्या नागरिकांच्या बोगस कागदपत्रांच्या छायांकित प्रति पुरावा म्हणून दिल्या.

*जिल्हाधिकारी यांच्यावर गंभीर आरोप, राजकीय गॉड फादरलाही सोडणार नाही.*

सिल्लोड चे उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण यांची ताबडतोब हकालपट्टी करण्याची मागणी मी मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे.ते बनवाबनवी,फसवा फसवी करत आहेत. मी माहिती माहितीच्या अधिकारात आतापर्यंत वाटप केलेल्या ४७०० जन्म मृत्यू प्रमाणपत्रांच्या संचिकेची कागदपत्रांची मागणी केली होती. यातील २२ हजार कागदपत्रे सापडत नसल्याचे मला सांगण्यात आले. मला २६०० अर्जदारांची ४३ हजार कागदपत्रे देण्यात आली. यासाठी मी १ लाख ३१ हजार ५०० रू भरले. यापैकी मी ४०० कागदपत्रांची तपासणी केली असता त्यात ३६२ नागरिकांना केवळ आधार कार्ड हा पुरावा म्हणून प्रमाणपत्र देण्यात आले आहे. व ११२ नागरिकांच्या अर्जावर वेगळी जन्मतारीख तर आधार कार्डवर वेगळी जन्मतारीख नोंदविण्यात आलेली आहे. यामुळे सिल्लोड येथील जन्ममृत्यू प्रमाणपत्रात वाटप प्रकरणी मोठा घोटाळा झालेला असून यात सिल्लोड चे उपविभागीय अधिकारी लतीत पठाण हे दोषी असून त्यांना जेलमध्ये जावे लागणार व त्यांची पाठराखण करणारे जिल्हाधिकारी यांना येथे ठेवणार नाही असे म्हणाले. यासोबतच सोमय्या यांनी लतिफ पठाण यांचे आका व राजकीय गॉड फादर असलेल्यानाही आम्ही सोडणार नसल्याचे सांगितले. यावेळी सोमय्या यांचे सोबत भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष अशोक गरुड,दिलीप दानेकर,कमलेश कटारिया,मोतीराम मिसाळ,विष्णू काटकर,मधुकर राऊत आदींची उपस्थिती होती.

> माजी खासदार किरीट सोमय्या यांनी उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण
> यांना सहकार्य करणाऱ्या आका व त्यांच्या राजकीय गॉडफादर ला सोडणार नाही असे म्हणाले तेव्हा त्यांचा रोख आमदार अब्दुल सत्तार यांचेकडे असल्याची चर्चा केल्या जात आहे.

> किरीट सोमय्या यांनी आमच्याकडे ११२ नागरिकांची कागदपत्रे तपासणीसाठी दिली असून या कागदपत्रांची तपासणी केल्यावर कारवाई बाबत निश्चित सांगता येईल.
> - दिनेश कुमार कोल्हे
> उपविभागीय अधिकारी, सिल्लोड.



## द•ख•ल

### सायकलवरून संघर्ष करत शिकलेली वैशाली सानप झाली मुंबई महापालिकेत कार्यकारी सहाय्यक!

दैनिक युवक आधार
निफाड तालुका प्रतिनिधी
राजेश भडांगे



**गोंदेगाव (ता. निफाड)** येथील वैशाली रघुनाथ सानप हिने आपल्या जिद्दीच्या जोरावर मुंबई महानगरपालिकेच्या 'कार्यकारी सहाय्यक' पदाची परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण करत घवघवीत यश मिळवले आहे. सामान्य शेतकरी कुटुंबातील मुलगी असूनही, आपल्या मेहनतीच्या आणि संघर्षमय प्रवासाच्या बळावर तिने हे यश संपादन केले आहे. वैशालीचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा गोंदेगाव येथे झाले. माध्यमिक शिक्षण व्ही.एन.नाईक माध्यमिक विद्यालय गोंदेगाव येथे पूर्ण केल्यानंतर, तिने लासलगाव कॉलेजमधून महाविद्यालयीन शिक्षण आणि पुढे नाशिक रोड बिटको कॉलेजमधून एम. ए. पदवी पूर्ण केली. स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी नाशिक येथे जाऊन योग्य मार्गदर्शन घेतले. डिसेंबर २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये तिची निवड मुंबई महानगरपालिकेच्या कार्यकारी सहाय्यक या पदासाठी झाली आहे. विशेष बाब म्हणजे, वैशालीने शैक्षणिक प्रवासात गोंदेगाव ते लासलगाव हा रोजचा प्रवास सायकलने करत संघर्ष केला. तिच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे व अभिमानाचे वातावरण असून, तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. हे यश केवळ तिचे नाही, तर गावातील प्रत्येक मुला-मुलीसाठी प्रेरणा देणारे आहे. जिद्द, चिकाटी आणि योग्य मार्गदर्शन याच्या जोरावर कोणतीही स्पर्धा जिंकता येते, हे वैशालीने सिद्ध करून दाखवले आहे. असे मत लासलगाव येथील मातोश्री हॉस्पिटल चे संचालक डॉक्टर विलास कांगणे यांनी व्यक्त केले आहे.

### रायगड प्रज्ञाशोध या परीक्षेमध्ये उसर्ली बुद्रुक शाळेचे घवघवीत यश.

दैनिक युवक आधार
पनवेल वार्ताहर



नुकत्याच पार पडलेल्या रायगड प्रज्ञाशोध या परीक्षेत रायगड जिल्हा परिषद शाळा ऊसर्ली बुद्रुक ची विद्यार्थिनी कुमारी विधी गणेश दळवी ही लेवल वन या परीक्षेत चांगल्या गुणांनी पास झाली व तिला लेवल टू या परीक्षेला संधी मिळालेली आहे. तरी ती लेवल वन या परीक्षेमध्ये चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्यामुळे शाळेचे मुख्याध्यापक श्री जयवंत पाटील सर आणि वर्गशिक्षक श्री जीवन राठोड सर यांनी तिला शुभेच्छा देऊन तिचे कौतुक केले. आणि लेव्हल टू या परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सौ चित्रा डांगरकर आणि शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष भाग्यश्री डांगरकर या सर्व मान्यवरांनी तिचे अभिनंदन केले व लेवल टू या परीक्षेसाठी तिला शुभेच्छा दिल्या.

### व्हॉइस ऑफ मीडिया यवतमाळ जिल्हा महासचिव पदी कविता धुर्वे यांची नियुक्ती

दैनिक युवक आधार
यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी
:-जितेंद्र खोडे



**यवतमाळ:-** देशातील क्रमांक एकची पत्रकार संघटना म्हणून नावारूपास आलेली व्हॉइस ऑफ मीडिया अल्पावधीतच देशाबाहेरही पोहोचली आहे. या संघटनेच्या अंतर्गत महिला पत्रकारांसाठी स्वतंत्र विंगची स्थापना करण्यात आली असून, यामध्ये कविता धुर्वे यांची यवतमाळ जिल्हा महासचिव पदी निवड करण्यात आली आहे.
व्हॉइस ऑफ मीडिया हे महिला पत्रकारांसाठी एक उत्कृष्ट व्यासपीठ आहे. ग्रामीण व शहरी भागातील तळागाळातील महिला पत्रकार या संघटनेमध्ये सामील होऊन पत्रकारांसाठीच्या पंचसूत्री मागण्यांसाठी संघर्ष करत आहेत. या वेळी कविता धुर्वे म्हणाल्या की प्रत्येक क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत दिसत आहे तरीपण "पत्रकारिता क्षेत्रामध्ये महिलांची संख्या खूपच कमी आहे म्हणून महिलांनी पत्रकारिता या क्षेत्रात येऊन लोकशाही च्या चौथ्या आधार स्तंभाला अजून बळकट करण्याकरिता यवतमाळ जिल्ह्यातील महिला पत्रकारांनी या संघटनेमध्ये सहभागी व्हावे. ही संघटना केवळ महिला पत्रकारांसाठी स्वतंत्र विंग असलेली असून, पत्रकारांच्या न्याय हक्कांसाठी लढणारी संघटना आहे. या निवडीसाठी संस्थापक अध्यक्ष संदीप काळे, राष्ट्रीय सचिव दिव्या भोसले, प्रदेशाध्यक्ष सविता चंद्रे, व रश्मी मारवाडी व जिल्हा अध्यक्ष प्रतिभा तातेड यांचे मार्गदर्शन स्तव ही निवड करण्यात आली. यवतमाळ जिल्हा महासचिव पदी कविता धुर्वे झाल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# तळा ज्युनिअर कॉलेजमध्ये पालकसभा संपन्न

दैनिक व आधार
तळा प्रतिनिधी




तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळा येथे संस्था पदाधिकारी शिक्षक व पालक यांची सहविचार सभा नुकतीच पार पडली. इयत्ता १२ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी जादा क्लास व वार्षिक नियोजन या विषयावर सर्वांगीण विकासासाठी पालकसभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी संस्थेचे सचिव श्री मंगेशशेठ देशमुख, शाळा समितीचे चेअरमन श्री महेंद्रशेठ कजबजे, सदस्य श्री महादेव बैकर, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री दिलीप ढाकणे, शिक्षक प्रतिनिधी प्राध्यापक दयानेकर, पर्यवेक्षक श्री महादेव लोकरे, सर्व प्राध्यापक व पालक उपस्थित होते. यावेळी १२ वी चे जादा तास घेणे, विद्यार्थ्यांची प्रगती, वर्गातील मोबाईचा योग्य वापर, महाविद्यालयात वेळेवर येणे, शालेय व सहशालेय उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभागी होणे, विद्यार्थ्यांमध्ये शिस्त रहावी यासाठी नियमित ड्रेसकोडमध्ये येणे, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी पालकांनी वर्गशिक्षकांशी संपर्क साधने, बाहेरगावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये म्हणून एस टीची सुविधा, विद्यार्थ्यांचे आरोग्य, वेळेवर भोजन घेणे आदी विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी संस्थेचे सचिव श्री मंगेशशेठ देशमुख, शाळा समितीचे चेअरमन श्री महेंद्रशेठ कजबजे, कार्यकारी मंडळाचे सदस्य श्री महादेव बैकर, प्राचार्य श्री दिलीप ढाकणे यांनी पालकांशी संवाद साधला. प्रत्येक पालकसभेला सर्व पालकांनी उपस्थित राहून आपल्या पाल्याच्या प्रगतीबद्दल चौकशी करावी असे काही पालकांनी उपस्थित नसलेल्या पालकांना आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी संस्थेचे पदाधिकारी व शिक्षक विशेष परिश्रम घेत असल्याचे प्राचार्य श्री दिलीप ढाकणे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या जीवनात पालकांची भूमिका महत्त्वाची असते कारण ते विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवतात आणि त्यांना योग्य शिक्षणाशी जोडून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरित करतात, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा यशाचा आलेख कालांतराने उंचावतो. अशी पालकांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. कार्यक्रमाचे निवेदन प्राध्यापक सर्जे व्ही बी यांनी केले. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व पालक उपस्थित होते.

## लवकरच करंजाडेत होणार नवीन पोलीस ठाणे - गृह राज्यमंत्री योगेश कदम



दैनिक युवक आधार
**पनवेल (वार्ताहर):** करंजाडे वसाहती मध्ये वाढते लोकसंख्या लक्षात घेता या परिसराला नवीन पोलीस ठाण्याची निर्मिती करावी या मागणसाठी मंत्रालयात योगेश कदम साहेब गृह (शहरी ) महसूल,ग्रामीण विकास व पंचायत राज, अन्न नागरि पुरवठा व ग्राहक संरक्षण,अन्न व औषध प्रशासकीय विभाग राज्यमंत्री यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी स्वतंत्र पोलीस ठाणे करंजाडे वसाहतीमध्ये लवकरच उभारण्यात येणार असे आश्वासन मंत्री महोदयांनी दिली. यावेळी उपतालुका प्रमुख गौरव गायकवाड, शिवसेना शहर संघटक स्वप्निल मोरे उपस्थित होते.

## राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या महाराष्ट्र राज्य प्रदेश उपाध्यक्ष पदी अंजेभाऊ चव्हाण यांची निवड..

दैनिक युवक आधार
परतूर- जालना (अशोक ठोके)

तालुक्यातील पाहेगाव येथील रहिवासी व सामाजिक कार्यकर्ते अंजेभाऊ चव्हाण यांची राष्ट्रीय बंजारा परिषद महाराष्ट्र राज्य प्रदेश उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे.ही निवड राष्ट्रीय बंजारा परिषदेचे संस्थापक अध्यक्ष धर्मनेता किसन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय अध्यक्ष विलास राठोड तसेच महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष भिकन जाधव,अँड.पंडित राठोड,महाराष्ट्र प्रदेश महासचिव उमेश राठोड ,गोर कलावंत मराठवाडा अध्यक्ष, पंडित महाराज,यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय अध्यक्ष विलास राठोड यांच्या हस्ते नियुक्तीपत्र व शाल व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले.यावेळीयुवा प्रदेश सचिव श्रीकांत राठोड, युवा मराठवाडा अध्यक्ष राजाराम पवार, युवा कार्याध्यक्ष जालना अजय पवार, मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष संदीप राठोड यावेळी अनेक राज्यातील पदाधिकारी , कार्यकर्ते मोठ्या संख्येने पोहरादेवी धर्म पिठ येथे उपस्थित होते.



# एन.एम.एम.एस.परीक्षेत पिंपळापूर शाळेचे सुयश

दैनिक युवक आधार
यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:
-जितेंद्र खोडे

**वडकी** : राळेगाव तालुक्यातील जि.प. उच्च प्राथमिक आदर्श शाळा, पिंपळापूरचे प्रियांशू सातकर, कु. निधी लिहीलकर, कु. मृणाली नहाले व कु. पुनम कोहळे असे चार विद्यार्थी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. NMMS शिष्यवृत्ती ही केंद्र सरकार पुरस्कृत असून यामध्ये पात्र होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रति वर्षी १२,००० रुपये याप्रमाणे पुढील चार वर्षे म्हणजे १२ वी उत्तीर्ण होईपर्यंत एकूण४८००० रुपये शिष्यवृत्तीचा लाभ मिळतो.

पिंपळापूर शाळेचे मुख्याध्यापक श्री. संदिप कचवे यांच्या नियोजनानुसार या शाळेमध्ये एनएमएमएस, महादीप, पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा अशा अनेक परीक्षांचे ज्यादा वर्ग घेतल्या जाते. थात NMMS परीक्षेचे मुख्य मार्गदर्शक श्री-मंगेश गोडबोले, श्री. राहुल बोरडे यांचे विशेष परीक्षम आहेत. तसेच श्री. सचिन कांबळे यांचे विशेष सहकार्य लाभते. पिंपळापूर शाळेत एकूण आठ वर्ग व १२३ विद्यार्थी असून चारच शिक्षक कार्यरत आहेत. शिक्षकांची कमतरता असताना सुद्धा योग्य नियोजन करून NMMS, पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा, महादीप परीक्षा, विज्ञान प्रद मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा, ज्ञान प्रदर्शनी, तालुकास्तरीय व जिल्हा-स्तरीय क्रीडा स्पर्धा या सर्वच उपक्रमामध्ये पिंपळापूर शाळा राळेगाव तालुक्यात अव्वल ठरली आहे हे विशेष .वरील सर्व उपक्रमामध्ये पं. स. राळेगावचे गट शिक्षणाधिकारी श्री. राजू काकडे, विस्तार अधिकारी श्री. निलेश दाभाडे व श्री. नवनाथ लहाने तसेच केंद्रप्रमुख श्री अनिल वरूडकर यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभत असते. शाळेला मिळालेल्या यशाबद्दल शा.व्य. समितीचे अध्यक्ष श्री योगेश शेंडे, उपाध्यक्षा सौ. शालिनीताई सातकर, सरपंच श्री. रविंद्र चौधरी, उपसरपंच श्री. किशोर नहाते, शाळेचे माजी मुख्याध्यापक श्री मोहन पवार, शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, पालक व पिंपळापूरचे सर्व ग्रामस्थ यांनी कौतुक केले तसेच जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा पिंपळापूर च्या शिक्षकांच्या नियोजना बद्दल व विद्यार्थी घडविण्यात असलेल्या आस्थे बद्दल या शाळेच्या सर्व शिक्षकां वर कौतुकाचा व अभिनंदन चा परिसरातून वर्षाव होत आहे




# पांडुरंग शेलार, समाजभूषण पुरस्काराने सन्मानित

दैनिक युवक आधार
पुणे वार्ताहर

संविधान हक्क परिषद व मंत्रालय वार्ता यांचे वतीने इंजि. पांडुरंग शेलार, माजी कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे यांना नुकतेच मा. शरदचंद्रजी पवार साहेब यांचे हस्ते समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. श्री. शेलार यांनी सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रात केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना "सन्मानचिन्ह" देवुन गौरविण्यात आले. यशवंतराव चव्हाण सभागृह, मंत्रालय, मुंबई येथे हा गौरव समारंभ दिनांक २९ मार्च २०२५



रोजी पार पडला. या कार्यक्रमास राष्ट्रवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार मा. शरदचंद्र पवार, मा. खासदार चंद्रकांत हंडोरे, अॅड अनिल अहिरे, महागायिका निशाताई भगत, डॉ. संजीवनी कांबळे, इजि. पांडुरंग शेलार आदी प्रमुख पाहुणे म्हणून परस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जगातील एक आदर्श संविधान निर्मिती केली. त्यामुळे श्रीलंका, चीन व पाकीस्तानच्या तुलनेत भारत देश एकसंघ व सुरक्षित ठेवण्याचे काम भारतीय संविधानाने केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून न्याय व मूलभूत हक्क भारतीयांना बहाल केले असले तरी देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाली तरी सर्व सामान्यांना अद्यापही त्यांच्या मूलभूत न्याय व हक्कापासून वंचित रहावे लागत आहे ही दुर्दैवाची बाब असल्याची खंत मा. शरदचंद्र पवार साहेब यांनी आपल्या भाषणात व्यक्त केली. दामोदर खोरे विकास प्राधिकारणाची स्थापना तसेच भाक्रानांगल धरणाची निर्मिती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली त्यामुळे पंजाब, हरियाणातील ९८% क्षेत्र ओलीताखाली आलेले आहे. संविधान निर्मिती बरोबरच भारताच्या जल व उर्जा क्षेत्राचा भक्कम पाया डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्यपूर्व काळातच रोवला असल्याचे पवार यांनी नमूद केले.

डा. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या उत्कृष्ट संविधान निर्मितीमुळे भारत देशाची लोकशाही दिवसेंदिवस जिवंत व परिपक्व होत असल्याचे विचार पवार यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले.

## खरे मित्र आयुष्यातील सर्वात मोठी संपत्ती

मित्र आपल्या जीवनातील एक अशी परिभाषा आहे की ते देवाने दिलेली एक अनमोल शक्ती आहे मित्र रक्ताचे नाते नसून परंतु रक्ताच्या नात्याचे पलीकडे त्याला आपल्या जीवनात स्थान आहे,मित्र हा निस्वार्थी असतो कारण जसे नाते हे आपल्याला आई किंवा वडील दोघांन मधून कोणी तरी सागितले आहे म्हणून आपण त्यांना आपले नातेवाईक म्हणतो जसे की हे बहिण - भाऊ,काका - काकू इत्यादी परंतु मित्र हे आपण स्वतः निवडलेले असतात त्या मध्ये जात- पात , गरीब - अमीर अस काही नसतं आपल्या जीवनामध्ये मित्राचे अनन्यसाधारण महत्व आहे. मैत्री हे एक असे नाते आहे जे जीवनाला सुंदर आणि अर्थपूर्ण बनवते. त्यात पण खूप प्रकार आज काल बनवले आहे जसे की हा माझा बालपणीचा मित्र - हा शाळेचा - कॉलेज असे किती तरी प्रकार समाजात आपल्याला पहायला मिळतात परंतु त्या सगळ्या मध्ये एक मित्र असा असतो की तो सगळ्या पेक्षा जास्त महत्वाचा असतो आणि त्याला आपण बोलतो की हा माझा खरे मित्र आहे.
पण का बोलतो आपण तस ? खरे मित्र कसे बनतात ? त्याच्या मागे एक कारण असते ते म्हणजे ते मित्र आपल्या आयुष्यात महत्त्वाची भूमिका बजावतात आणि त्यांच्याशिवाय आयुष्य मधील सुख दुःख हे अपूर्ण आहे. आपल्या दुःखाच्या वेळेस जो धावून येतो किंवा आपल्या परिस्थितीशी आपल्याला जुडवून घेतो न सांगता हजर राहतो,आपले दुःख स्वताचे दुःख समजून त्यावर उपाय शोधतो,किंवा आपल्या मनात काय भावना आहे हे त्याला खूप लवकर कळते,आणि सर्वात महत्वाचे तो आपल्या चुका शोधून त्यावर उपाय सांगतो फुकटची प्रशंसा करत नाही जे खरे आहे तोच मार्ग दाखवतो तो खरा मित्र असतो. खरे मित्र आपल्याला प्रत्येक परिस्थिती मध्ये भावनिक आधार देतात, जीवनाची गुणवत्ता सुधारतात आणि सुरक्षितता आणि विश्वासाची भावना प्रदान करतात. अजून अस काय असत खऱ्या मित्राची वैशिष्ट्ये की त्याला आपण इतर लोकांपेक्षा वेगळे बनवतो
निष्ठा - आपल्या आयुष्यात कोणतीही परिस्थिती असो कसला ही प्रसंग असो , ते मित्र नेहमीच आपल्यासोबत आपल्या पाठीशी उभे राहतात. आधार - ते नेहमीच आपल्याला पाठिंबा देतात आणि आपले ध्येय साध्य करण्यात मदत करतात .ते आपल्याला सामाजिक आधार देतात, ज्यामुळे आपल्याला समाजात आपले स्थान शोधण्यास मदत होते.आपल्याला भावनिक आधार देतात, जे आपल्या मानसिक आरोग्यासाठी खूप महत्वाचे आहे. विश्वास -खरे मित्र आपले विश्वासू असतात आणि ते कधीही आपला विश्वासघात करत नाहीत. ते आपल्याला सुरक्षितता आणि विश्वासाची भावना देतात, जे आपल्या जीवनात खूप महत्वाचे आहे. सहानुभूती - खरे मित्र आपल्या भावना समजून घेतात आणि आपल्याला सहानुभूती देतात त्यांना कधीच आपण माफी मागत नाही. जीवनाचा दर्जा सुधारतो - ते आपल्याला आपल्या जीवनाचा दर्जा सुधारण्यास मदत करतात, कारण ते त्यांना आपल्या मधून सर्व गुण कला माहित असल्यामुळे ते नेहमीच आपल्याला नवीन गोष्टी शिकण्यास आणि अनुभवण्यास प्रेरित करतात . खऱ्या मित्राचे महत्त्व आपल्या आयुष्यात अनुभवातून वेगवेगळे महत्व असते, परंतु आजच्या या धावत्या युगात सगळ्यांकडे एक तरी असा मित्र पाहिजे की ज्याला आपण आपल्या मनातलं सगळं सांगू शकलो पाहिजे.कारण या ताण-तणावाच्या युगात वेगवेगळ्या प्रकारे आपल्याला मानसिक ताण येते आणि ते घरातील घराबाहेरचे वेगवेगळे उद्भवलेले समस्या तो आपल्याला सोडून देण्यास मदत करतो किंवा आपण आपल्या मनातली गोष्ट कोणाला सांगितल्यावर (म्हणजेच आपल्या खऱ्या मित्राला ) मनाची थोडी का होईना शांती होते आणि त्या शांती मुळे आपल्या जीवन हे चांगल्या वळणाने लागते त्याच्यामुळे आपल्या जीवनात एक तरी असा मित्र असावा की ज्याला आपण आपला खरा मित्र समजू शकतो किंवा बोलू शकतो. म्हणून तर म्हणता की *खरे मित्र आयुष्यातील सर्वात मोठी संपत्ती असते



**लेखक**
**पठाण जावेद युसुफखान**
**संस्कार बालक मंदिर जाधववाडी**
**छत्रपती संभाजीनगर**

## मोहपाडा ग्रामपंचायतीला आयएसओ नामांकन मिळाल्याने सरपंच उपसरपंच व सर्व सदस्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने सत्कार

दैनिक युवक आधार
रसायनी आनंद पवार

खालापूर तालुक्यातील सर्वात मोठी व प्रतिष्ठेची समजली जाणारी वासांबे (मोहपाडा) ग्रामपंचायतीला नुकताच आय एस ओ ९००१ नामांकन मिळाल्याने सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. वासांबे मोहपाडा ग्रामपंचायतीला आय एस ओ ९००१ नामांकन प्राप्त झाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित दादा पवार गट) रसायनी विभागाच्या वतीने मंगळवारी चांभाली येथील राधाकृष्ण मंदिराच्या सभागृहामध्ये सरपंच उपसरपंच व सर्व सदस्यांचा जाहीर नागरी सत्कार आयोजित करण्यात आला होता. या सत्कार सोहळ्याला पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती गजानन माळी,ज्येष्ठ नेते प्रमोद राईलकर,सरपंच उमाताई मुंढे, माजी सरपंच संदीप शेठ मुंढे,मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष दीपक कांबळी,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विभागीय अध्यक्ष मुकुंदशेठ जांभळे,नामदेवशेठ कोकंबे,पांडूशेठ पारंगे, जयराम पाटील,संतोष मांडे,गणेश काळे, डॉक्टर चव्हाण,विल्यम मार्टीस,संजय कांबळे यांच्यासह स्वच्छता कमिटीचे सदस्य परिसरातील विविध पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सरपंच उमाताई मुंढे व सर्व



सन्माननीय सदस्यांच्या मान्यवरांच्या हस्ते शाल पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात गणेश काळे यांच्या सुरेल आवाजात विठुरायाच्या गीताने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कैलास म्हात्रे यांनी केले.

दैनिक युवक आधार (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

द•ख•ल

## व्यसन मुक्तीचा ध्यास घेतलेले आदरणीय व्यक्तिमत्तव - दिलीप किसनराव आमले

**दैनिक युवक आधार**
**नेरूळ प्रतिनिधी**

व्यसन मुक्तीचा ध्यास घेतलेलेहआदरणीय व्यक्तिमत्त्व मा श्री दिलीप किसनराव आमले व्यसन म्हणजे काही क्षणांचं सुख, पण संपूर्ण आयुष्याचं दुःख.एकदा का व्यसनाच्या विळख्यात पडलं, की माणूस हळूहळू स्वतःपासून, कुटुंबापासून, आणि आयुष्याच्या खऱ्या आनंदापासून दूर जातो. घर म्हणजे प्रेम, आपुलकी, आधार आणि समाधान यांचं केंद्र. पण जेव्हा व्यसन दारात येतं, तेव्हा हे सगळं हरवतं. पती-पत्नीचं नातं ताणतणावात अडकतं, मुलांच्या डोळ्यात वडिलांचा आदर नाहीसा होतो, आणि घराच्या चार भिंतींमध्ये अस्वस्थतेचं वातावरण निर्माण होते.समाजामध्ये असे काही माणसं असतात जे इतरांसाठी प्रकाशाचा दीप बनतात. अशीच एक व्यक्ती म्हणजे व्यसनमुक्तीसाठी कार्यरत कार्यकर्ते/समाजसेवकहमा श्री. दिलीप आमले साहेब. ही व्यक्ती व्यसनाच्या जंजाळात फसलेल्याना अंधारातून बाहेर काढण्याचं दिव्य काम करत आहे. व्यसनात अडकलेल्या व्यक्तींची मानसिकता समजून घेणं, त्यांचं पुनर्वसन करणं, त्यांना नवा आशावाद देणं हे त्यांच्या कार्याचं मर्म आहे. अशा व्यक्तींमुळे समाजामध्ये सकारात्मक बदल घडतो. त्यांच्या कामामुळे अनेक घरांमध्ये पुन्हा हसू फुलतं, नाती जपली जातात आणि जीवन नव्याने सुरू होतं.अशा व्यसनमुक्तीसाठी समर्पित आदरणीय व्यक्तिमत्त्वाच्या कर्तृत्वाला सलाम कारण ते केवळ कार्यकर्ते नाहीत, ते समाजाचे खरे नायक आहेत.मा.श्री.दिलीप किसनराव आमले साहेब.आपणास वाढदिवसानिमित्त आरोग्यादायी आयुष्यासह दिर्घ आयुष्य मनःपूर्वक शुभेच्छा.



## पनवेल महापालिकेची खारघर परिसरात अतिक्रमण कारवाई

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**

खारघर परिसरातील पदपथावरील सामानांवर पालिकेकडून कारवाई करण्यात आली आहे. येथील ब्युटीफूल कटलरी दुकान, तवा आणि रसोई आदी नामांकित दुकान आणि हॉटेल बाहेर सामान ठेवण्यात आले होते. याचा पदपथावरील नागरिकांना ये-जा करण्यास अडचण होत होती. त्यामुळे पनवेल महापालिकेकडे याबाबत तक्रार करण्यात आली होती. प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी यांच्या आदेशानुसार अतिक्रमण पथकाने खारघर परिसरात मार्जिनल स्पेस आणि पदपथावर अतिक्रमण करून विक्रीसाठी ठेवण्यात आलेले साहित्य जप्त केले आहे. पालिकेच्या या कारवाईमुळे विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहे. तर पदपथ मोकळे झाल्याने खारघरवासीयांना दिलासा मिळाला आहे. तर पनवेल महापालिकेकडून यापुढेदेखील अशा प्रकारे कारवाई केली जाणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे सामान पदपथावर ठेवू नये, असे आवाहन पालिकेने केले आहे.

## प्रभू रामाचा जन्मोत्सव आनंदात साजरा .

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

मुरुड परिसरात नामांकित असणाऱ्या व सीबीएसई चे प्रभावी अध्यापण करून कै. गोरोबा (काका) झाडके यांच्या ध्येयपूर्तीने मार्गक्रमण करणाऱ्या श्री छत्रपती शाहू मॉडर्न इंग्लिश स्कूल मध्ये प्रभू रामचंद्राचा जन्मदिन मोठ्या आनंदाने साजरा करण्यात आला . संस्थाध्यक्ष दिपक झाडके , सचिव प्रा. दत्तात्रय जाधव व कोषाध्यक्ष प्रा. शंकर पाटील यांच्या मार्गदर्शनातून हा उत्सव साजरा करण्यात आला . यावेळी संस्थेच्या सदस्या आश्विनी झाडके , मुख्याध्यापक बाबू थॉमस , उपमुख्याध्यापक उमेश कुंभार , समन्वयक रामेश्वर शेटे यांच्या हस्ते प्रभू रामाच्या प्रतिमेचे पूजन करून आरती करण्यात आली . शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी प्रभू राम , लक्ष्मण , सीता , हनुमान यांची वेशभुषा केली होती . यावेळी पदयात्रा काढण्यात आली होती . तर प्रभू रामचंद्राच्या जयजयकाराने संपूर्ण शालेय परिसर दणाणून गेला होता . कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजेश बावळे , प्रशांत कुलकर्णी , उमेश मारवाड, गीता फेरे , संध्या माळी, रेश्मा कुंभार, महादेवी देशमुख , ज्योती ढेकणे, उषा नाईकनवरे , आकांक्षा लोमटे , कल्याणी राऊत , बबीता सिंग तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान लाभले .



# थोर समाजसुधारक स्व. जनार्दन आत्माराम भगत यांच्या ३७ व्या पुण्यतिथी निमित्त

### "स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा २०२५" सर्वोत्कृष्ठ ग्रामपंचायतीला १ लाख रुपये बक्षीस

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

कष्टकऱ्यांचे द्रष्ट नेते थोर समाजसुधारक स्व. जनार्दन आत्माराम भगत यांच्या ३७ व्या पुण्यतिथी निमित्ताने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत पनवेल तालुकास्तरीय "स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा २०२५" स्पर्धेचे आयोजन करण्यात आले



आहे. जनार्दन भगत साहेबांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील कार्य अफाट राहिले आहे. त्यांनी अहोरात्र जनतेची सेवा केली. फक्त राजकारण नाही तर सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. आयुष्यापेक्षा ध्येय्य मोठे असले पाहिजे, ही शिकवण त्यांनी समाजामध्ये रुजवली. या भागाचे ते देवदूत होते. त्या अनुषंगाने स्व. जनार्दन भगत साहेबांच्या नावाने स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार या वर्षीही देण्यात येणार आहे. त्यानुसार तालुक्यातील ग्रामपंचायतींचे स्वच्छतेच्या निकषावर सर्वेक्षण येणार आहे. या स्पर्धेतील प्रथम क्रमांकास १ लाख रुपये व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांकाला ५० हजार रुपये व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांकाला २५ हजार रुपये व सन्मानचिन्ह तसेच दोन उत्तेजनार्थ ग्रामपंचायतींना प्रत्येकी ११ हजार रुपये व सन्मानचिन्ह देऊन ०७ मे रोजी उलवा नोडमधील रामशेठ ठाकूर मैदान येथे होणाऱ्या पुण्यतिथी कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेचा तालुक्यातील ग्रामपंचायतींनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव परेश ठाकूर यांनी केले आहे.

## शेतकरी आत्महत्या ग्रस्त कुटुंबास भुतेकर यांची भेट..

**दैनिक युवक आधार**
**वाशिम जिल्हा/प्रतिनिधी**
**करण धोंगडे**



पाचंबा तालुका रिसोड येथील स्व. धनंजय जनार्दन गव्हाणे यांनी नापिकी आणि शेतीवर असणारे कर्ज याला कंटाळून आत्महत्या केली. ते अत्यल्प भूधारक शेतकरी होते त्यांच्या परिवारात ८५ वर्षाचे वयोवृद्ध वडील, पत्नी, तीन मुली त्यातील एक विधवा मुलगी, एक मुलगा एवढा परिवार सोडून स्वर्गीय धनंजय यांनी आत्महत्येचा निर्णय घेतला. या आत्महत्या ग्रस्त कुटुंबास विष्णुपंत भुतेकर यांनी नुकतीच भूमिपुत्र च्या पदाधिकाऱ्यांसह भेट दिली. यावेळी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी आत्महत्याग्रस्त कुटुंबाच्या पाठीशी उभे राहणार असून रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीकडून रिसोड तालुक्यातील आत्महत्याग्रस्त कुटुंबांना मदत देणार असल्याचे सांगितले. त्यांची सोबत भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे राज्य संघटन डॉक्टर जितेंद्र गवळी, रवींद्र चोपडे, संतोष गव्हाणे, अजय गव्हाणे, सुनील जाधव हे पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

## जाहीर पक्षप्रवेशः शिवसेनेची ताकद वाढवूया, बाळासाहेबांच्या विचारांना पुढे नेऊया!.. - मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे

### करंजाडेतील युवा कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश

**दैनिक युवक आधार**

**पनवेल/प्रतिनिधी - करंजाडे वसाहतीमध्ये डॅशिंग उपतालुका प्रमुख गौरव दादा गायकवाड यांच्या सहकार्याने मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या उपस्थितीत युवा कार्यकर्त्यांचा जाहिर पक्प्रवेश करण्यात आल. यावेळी शिवसेनेची ताकद वाढवूया, बाळासाहेबांच्या विचारांना पुढे नेऊया असे उदगार बारणे यांनी पक्प्रवेश कार्यक्रमामध्ये व्यक्त केले. करंजाडे वसाहतमध्ये महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून करंजाडेतील डॅशिंग उपतालुका प्रमुख गौरवदादा सुरेश गायकवाड यांच्या सहकार्याने वडघर जिल्हा परिषद मधील अनेक युवा कार्यकर्त्यांचा मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना पक्षात यांचा समाधान परदेशी, रोहीत वैराळे, जिगर परदेशी, अमोल लांडगे, चाणक्य, परशुराम कांबळे, सचिन दिपके, राम गवळी, रवी गवळी, निलेश आंबोरे, आलंतमश तुपके, वसिम शेख, गणेश कांबळे जाहीर पक्ष प्रवेश करण्यात आला. यावेळी उपस्थित जिल्हा प्रमुख उरण विधानसभा आतुल**





**भगत, उरण विधानसभा संपर्क प्रमुख रमेश म्हात्रे व जिल्हा प्रमुख पनवेल विधानसभा, रामदास शेवाळे, महिला जिल्हा संघटक, मेघाताई दमबडे, शिवसेना उप-जिल्हाप्रमुख, विनोद साबळे, जिल्हा प्रमुख उरण विधानसभा सचिन, हितेश नाईक, तालुका प्रमुख पनवेल ग्रामीण, रघुनाथ दादा पाटील, तालुका प्रमुख पनवेल शहर, रुपेश ठोंबरे, तालुका संपर्कप्रमुख पनवेल ग्रामीण बाळासाहेब नाईक, करंजाडे शहर संपर्क प्रमुख चंद्रकांत गुजर साहेब, करंजाडे शहर संघटक करंजाडे, स्वप्निल मोरे, करंजाडे शहर प्रमुख मिरेंद्र शहारे व सर्व पदाधिकारी उपस्थित होते.**

## शेतकरी कामगार पक्ष पुरस्कृत वाकडी येथे टेनिस क्रिकेट सामने प्रकाश झोतात संपन्न झाले

**दैनिक युवक आधार**
**सुरेश भोईर( कार्यकारी संपादक )**

दिनांक ८ एप्रिल २०२५ रोजी पनवेल येथील वाकडी गावात शेतकरी कामगार पक्ष पुरस्कृत पनवेलचे माजी उपसभापती व पनवेल तालुका चिटणीस राजेश केणी यांचा माध्यमातून टेनिस क्रिकेट सामने आयोजित केले होते.या सामन्यांचे उदघाटक शेतकरी कामगार पक्षाचे माजी.आमदार बाळाराम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी त्यांनी आपले विचार मांडले. पूर्वी कबड्डी आणि इतर क्रीडाप्रकार होते परंतु आता क्रिकेट हा व्यवसायिक आणि सगळ्या दृष्टीने महत्त्वाचा खेळ झालेला आहे, त्यामुळे युवकांना प्रेरणा देणारा त्यांना चांगलं भविष्य देणारा असा हा क्रीडा प्रकार आहे आणि या क्रीडा प्रकाराचा आपल्याकडे चांगला लाभ सगळ्यांनी घ्यावा असं मला वाटते असे मत आमदार बाळाराम पाटील यांनी मांडले. या प्रसंगी उपस्थित पनवेल विधानसभा अध्यक्ष काशिनाथ पाटील,जिल्हा परिषद सदस्य विलास फडके,शिवकर ग्रामपंचायत माजी सरपंच अनिल ढवळे दूंदरे ग्रामपंचायत सरपंच सुभाष भोपी,उद्योजक संजय गवळी,वकील गायकर कामगार नेते रवींद्र शेळके चिंचवली पोलीस,पाटील, महादू पाटील,पारस मसालाचे संचालक विष्णू शेळके,विठ्ठल पाटील ग्रामपंचायत माजी सदस्य बाळाराम गवळी,अर्जुन पाटील,लहू शेळके,हरीश शेळके,कैलास भोपी, रायगड भूषण महादेव गायकर,रीटघर ग्रामपंचायत माजी सरपंच भारत भोपी अदिसह मान्यवर व क्रीडाप्रेमी उपस्थित होते






# सिंचन विहीर, गायगोठा, वृक्षलागवडीचे प्रस्ताव धुळखात; शेतकरी पुत्रांचा बीडीओंना जाब

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** सिल्लोड तालुक्यात वर्षभरापासून वैयक्तिक लाभाच्या योजना बंद आहेत.यामध्ये रोजगार हमी योजनेच्या सिंचन विहीर,गायगोठे,वृक्षलागवडिचे प्रस्ताव धुळखात पडून आहे.तसेच जे मंजूर कामे आहेत त्यांचेही जिओ टॅगिंग का करीत नाही असे प्रश्न विचारून शेतकरी पुत्रांनी सिल्लोडच्या गटविकास अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरल्याचे पाहायला मिळाले. वर्षभरात 103 गावात फक्त 63 कामे सुरु असल्याने शेतकरी पुत्रांनी नाराजी व्यक्त केली. संबंधित मागण्यांचे निवेदन ही बिडीओना देण्यात आले.त्यामध्ये म्हटले आहे की वैयक्तिक लाभाच्या योजनांना बिडिओ मंजुरी देत नाही.जे कामे मंजूर आहे ते सुरु नाही, जे कामे पूर्ण झालेले आहे त्या कामाचे



अनुदान शेतकऱ्यांना मिळत नाही.येत्या पंधरा दिवसात मागण्या मान्य न झाल्यास विभागीय आयुक्तांकडे उपोषण करणार असल्याचा ईशारा बळीराजा फाऊंडेशन चे अध्यक्ष् नारायण लोखंडे, युवा शेतकरी फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश वराडे यांनी दिला.

शेतकऱ्यांसाठी वैयक्तिक लाभाच्या योजना वर्षभरात कधीही मंजूर करण्यात येतात. मात्र संबंधित अधिकारी शेतकऱ्यांना लाभ मिळवून देत नाही. काम बंद असल्याचे वरिष्टांचे पत्र सांगून शेतकऱ्यांचे कामे अडवितात. बिडीओंची चौकशी लावण्यासाठी आयुक्तांकडे तक्रार दाखल करून शेतकऱ्याचे प्रश्न मार्गी न लागल्यास 1 मे रोजी उपोषण करणार आहे.

नारायण लोखंडे - अध्यक्ष बळीराजा फाऊंडेशन

यांनी सांगितले. अनिल दांडगे,गणेश गायकवाड , गजानन साखळे , योगेश गोरे, दिगंबर वराडे, शिवाजी वराडे,विष्णू लहाने,अरुण वाघ, संतोष वराडे,अनिल काकडे, करण काकडे, अंकुश वराडे,सागर, साखळे, संदीप वराडे, समाधान वराडे, काकासाहेब गोरे, यावेळी शेतकरी उपस्थित होते.

**"काम केलं, पण पैसे मिळाले नाहीत".**

विहीर खोदली, शेततळं तयार केलं, गोठाही उभारला पण सरकारकडून मानधन नाही. ज्यांनी स्वतःच्या पैशातून कामं करून टाकली, ते आजही थकबाकीच्या आशेवर जगतायत.

पंचायत समिती डोळेझाक करतेय काय ? असा प्रश्न पडत आहे.

हजारो अर्ज पंचायत समितीकडे धूळ खात पडलेत. केवळ मंजुरीच नाही, तर मंजूर अर्जांवरही पुढील कारवाई नाही. शेतकऱ्यांचा वेळ, पैसा आणि मेहनत वाया जातेय – पण उत्तर देणारं कुणीच नाही!

"MGNREGA ही कागदोपत्री योजना आहे का?"

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर प्रशासन गप्प. कोण जबाबदार? हा निधी कुठे अडतोय? का अडतोय? आणि शेतकऱ्यांना का झुलवतंय. मानधन द्या. योजना मंजूर करा, कामं सुरू करा. नाहीतर आम्ही रस्त्यावर उतरू!"

गणेश पुंडलिक वराडे
शेतकरी

## गुलमोहर

गुलमोहराच्या झाडाखाली,
थोडा वेळ विश्रांती घ्यावी,
हळूवार येणाऱ्या वाऱ्याने,
फुलांची रांगोळी सांडावी! ॥१॥

तळपत्या उन्हात,
गुलमोहराने हसावे,
लाल - नारंगी स्वप्नांत,
पाखरांनी गीत गावे ॥२॥

गुलमोहर तुझ्या छायेत,
दीनदुखी येत जावे,
दुखः हरपूनी जाता,
गारवांने मन प्रसन्न व्हावे ॥३॥

गुलमोहराच्या सावलीत,
साऱ्या चिंता विरून जाव्यात,
निसर्गाच्या या संगतीने,
आनंदाच्या लाटा याव्यात! ॥४॥

गुलमोहराच्या फुलांनी,
रंग द्यावा या जगाला,
प्रेम, शांती अन् सुखाने,
भरून टाकावे हृदयाला! ॥५॥

. प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर
मु.पो. पिंपळनेर( गोपाल नगर) ता. साक्री जि. धुळे

## भिरवंडेकर महिलांनी गाजवल कोकणच नाव.

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनिधी**
**-गुरूनाथ तिरपणकर**

मालवणी भाषा ही जगाच्या पाठीवर नेऊन ठेवली ती म्हणजे कै मच्छिंद्र कांबळी यांनी. आणि त्याच मालवणी भाषेत संपूर्ण कोकण दर्शन घडवलं गीतकार संगीतकार ध्वनिमुद्रक श्री श्रीकृष्ण सावंत यांनी. साध्या सोप्या सरळ मालवणी भाषेत प्रत्येक कोकणी माणसाला आवडेल असे गीत संपूर्ण महाराष्ट्राने उचलून धरलं. मागील वर्षी कनेडी विद्यामंदिरच्या माजी विद्यार्थी संमेलनात या गीताच सादरीकरण झालं.

आणि सोशल मीडियावर या गाण्याने धुमाकूळ घातला. कणकवली तालुक्यातील भिरवंडे गावामधील महिला गायकांनी ते गायलं असून त्याच गावच्या महिला कलाकारांनी हे गीत साकारल.

सौ उज्वला सुकाळी यांनी
या गीताच नृत्य दिग्दर्शन केलं. सौ दिपाली सावंत सौ कल्याणी वाक्कर यांनी या गीतासाठी प्रचंड मेहनत घेतली.

रंजना सावंत, साक्षी सावंत, निधी सावंत, उज्वला सुकाळी, शुभांगी सावंत यांनी हे गीत गायलं. गावामधील 42 महिला या गाण्यात सहभागी झाल्या. हे गीत साकारण्यात श्री



श्रीकृष्ण सावंत यांचा मोलाचा वाटा आहे. या गीतामुळे कोकणचे नाव सातासमुद्रापार गेले यात शंकाच नाही.सर्व महाराष्ट्रातून या गीताची प्रशंसा होत आहे. आणि त्याचे सर्व श्रेय हे श्रीकृष्ण सावंत आणि सर्व भिरवंडेकर महिलांचे आहे. हे गीत प्रत्येक कोकणी माणूस गुणगुणत आहे. आमचो कोकण या मालवणी गीतामध्ये सौ.सुप्रिया सावंत,सौ.धनश्री सावंत,सौ. अंकिता सावंत.सौ.राजश्री सावंत,सौ.श्रद्धा सावंत,सौ.विना सावंत,सौ.दीपा सावंत,सौ.निधी सावंत,सौ.समिक्षा सावंत,सौ.मयुरी सातार्डेकर ,सौ. हर्षदा सावंत .या भिरवंडेकर महिलांनी नृत्य आणि गायन या कलाविष्काराने 'आमचो कोकण'ही गीत सर्वांगसुदर करून जगाच्या पाठीवर अजरामर केले त्याचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

## "कोंडाळा महाली येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त १८-१८तास अभ्यास करण्याच्या संकल्प"

### संघशक्ती तरुण मंडळाच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी**
**रणजीत सिंग ठाकूर**

वाशिम ; डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या 134 व्या जयंतीनिमित्त कोंडाळा महाली येथील संघशक्ती तरुण मंडळाच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दरवर्षीप्रमाणे याही वर्षी करण्यात आलेले आहे.यामध्ये प्रामुख्याने निबंध स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा संगीत खुर्ची नृत्य स्पर्धा चालता बोलता व तसेच 18 तास अभ्यास असे विविध कार्यक्रम असून यामध्ये काल दिनांक 7 एप्रिल 2025 रोजी सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत 18 तास अभ्यास हा उपक्रम राबविण्यात आला यामध्ये गावातील एकूण 27 मुलांनी सहभाग घेतला त्यामध्ये सर्व मुलांनी 18 तास अभ्यास करून महामानवाला मानवंदना देण्यात आली तसेच संघशक्ती तरुण मंडळाच्या अध्यक्ष उपाध्यक्ष व सर्व सदस्य यांच्या पुढाकाराने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनामध्ये 18-18 तास अभ्यास करून आपल्याला समता स्वातंत्र्य व बंधुता या तत्त्वावर जीवन जगण्याची प्रेरणा मिळाली आहे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या संपूर्ण आयुष्यामध्ये 18-18 तास अभ्यास करून कशाप्रकारे आपले जीवन सुधारले याचे महत्त्व विद्यार्थ्यांना कळावे म्हणून हा उपक्रम राबविण्यात आला असून सर्वत्र गावातून या उपक्रमाचे कौतुक केल्या जात आहे. असेच वेगवेगळे उपक्रम शक्ती तरुण मंडळाच्या वतीने करण्यात येतात असतात या वेळी संघ शक्ती तरूण मंडळ चे अध्यक्ष धम्मरतन आघम, उप अध्यक्ष सुरेश आघम, सह भीम जयंती उत्सव समिती चे अध्यक्ष मिलिंद आघम, व नियोजक जीवन आघम यांनी विशेष परिश्रम घेतले



## मराठी पत्रकार परिषदेच्या जिल्हा उपाध्यक्षपदी अविनाश कदम यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**आष्टी। प्रतिनिधी मारुती सत्रे**



आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम हे गेल्या पंधरा वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात राजकीय,सामाजिक,शैक्षणिक,धार्मिक, शासकीय व प्रसिद्धी पासून कोसो दूर असलेल्या वंचित घटकाला न्याय देण्याचे काम करत आहेत व दैनिक लोकमत, मराठवाडा साथी या वृत्तपत्र आणि आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या माध्यमातून सामाजिक जोपासना करून आपली वेगळी ओळख निर्माण करणारे अविनाश कदम यांच्या कामाची दखल मराठी पत्रकार परिषदेने घेतली असून पुन्हा बीड जिल्हा उपाध्यक्षपदी फेरनिवड मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख यांच्या आदेशानुसार जिल्हाध्यक्ष विशाल साळुंखे यांनी बीड येथे ८ एप्रिल रोजी शासकीय विश्रामगृहात झालेल्या मराठी पत्रकार परिषदेच्या बीड जिल्हा पदाधिकारी यांच्या बैठकीत सत्कार करून व नियुक्तीपत्र देऊन निवड केली आहे. अविनाश कदम यांच्या निवडीबद्दल युवा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष निसार शेख,सचिव जावेद पठाण,कार्याध्यक्ष अक्षय विधाते, कार्यवाहक गहिनीनाथ पाचबैल,अतुल जवणे, संघटक समीर शेख, प्रेम पवळ, सहसचिव संतोष नागरगोजे,विधी सल्लागार अड किशोर निकाळजे,संपादक बबलू सय्यद, जेष्ठ पत्रकार बा म पवार, संतोष दाणी,राजेंद्र लाड, जेष्ठ पत्रकार सिताराम पोकळे, संतोष तांगडे, सोपान पगारे, मारूती संत्रे,आदिनाथ ठोंबरे, शिक्षक अनिल बेदरे,किरण शिनगिरे, विजय राजपुरे, महिला पत्रकार प्रिया पवळ, सुरेश मोरे, विपुल सदाफुले यांच्यासह बीड,आष्टी, पाटोदा, शिरूर, अंबाजोगाई, गेवराई, परळी, धारूर, वडवणी तालुक्यातील पत्रकार बांधवांसह, राजकीय, सामाजिक, धार्मिक,मित्र परिवार व विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## उपक्रमशील शिक्षक मोहम्मद मोईन मोहम्मद यासिन रजा यांना शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडीओ निर्मिती स्पर्धा २०२३ मध्ये विज्ञान विषयात तालुका स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला

**दैनिक युवक आधार**
**.रणजीत सिंह ठाकुर**
**रिसोड तालुका प्रतिनिधी**




**रिसोड:** डॉ अल्लामा ईकबाल ऊर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज रिसोड मधील उपक्रमशील विज्ञान शिक्षक मोहम्मद मोईन मोहम्मद यासिन रजा यांनी सत्र २०२३-२०२४ महाराष्ट्र शासन शिक्षण विभागाने द्वारा आयोजित शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडीओ निर्मिती स्पर्धा २०२३ आयोजित करण्यात आली होती यात संपूर्ण महाराष्ट्रातील शिक्षकांनी सहभाग घेतला होता वाशिम जिल्ह्यातील शिक्षकांनी सहभाग घेतला यात गट ६वी ते ८ वी विज्ञान विषयात तयार करण्यात आलेल्या शैक्षणिक व्हिडीओ ला रिसोड तालुक्यातुन प्रथम क्रमांक पटकाविला व त्यानं वाशिम डायटला आमंत्रित करून प्राचाय भा.भ पुटवाड व जिल्हा समन्वयक जगदीश करडे यांनी पुरस्कार प्रदान कले. मोहम्मद मोईन मोहम्मद यासिन रजा सरांनी आपल्या यशाचे श्रेय आईला दिलं. व यशा साठी संस्था अध्यक्ष मोहम्मद कबीर मोहसीन सर, मुख्य अधिकारी डॉ वकार मोहसीन, मुख्याध्यापक जमीर खान सर व सर्व सहकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सहकार्य बद्दल आभार मानले.

## स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष दिवंगत मनोज भाई संसारे यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना अल्पोहारचे वाटप

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष दिवंगत मनोज भाई संसारे यांच्या जयंतीनिमित्त रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी गुरू लिंगेश्वर शाळा पनवेल येथील विद्यार्थ्यांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले आहे. त्यावेळी त्यांच्यासोबत पनवेल शहर अध्यक्ष निलेश कांबळे व मुख्याध्यापक प्रवीण शिरवळ व शिक्षक वर्ग उपस्थित होते. मनोज संसारे हे महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचे प्रखर व आक्रमक नेते होते. दलित समाजाला, झोपडपट्टीतील समाज बांधवांना व महाराष्ट्रातील तमाम मागासवर्गीय समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी अनेक आंदोलने केली होती. त्याचबरोबर महाराष्ट्राच्या विधिमंडळामध्ये त्यांनी आमदार म्हणून आपले कारकीर्द साजरी केली होती. मुंबई महानगरपालिकेमध्ये ते नगरसेवक म्हणून निवडून आलेले होते . त्यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातून हजारो आक्रमक कार्यकर्ते तयार झालेले आहेत व त्यांच्या विचारांचा वारसा घेऊन आजही हजारो कार्यकर्ते समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी कार्यरत आहेत. अशी माहिती महेश साळुंखे यांनी त्यांच्या जयंतीच्या भाषणामध्ये दिली.



# सालाबादप्रमाणे याही वर्षी शिवसेनेच्या वतीने शिवनेरी मराठी दिनदर्शिका प्रकाशन सोहळा.

**दैनिक युवक आधार -**
**-संतोष पुदाले**
**तुळजापूर धाराशिव**

नळदुर्ग शहर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या वतीने सालाबादप्रमाणे याही वर्षी हिंदू नवीन वर्षाच्या गुढीपाडवा निमित्त वार्षिक २०२५-२६ शिवनेरी या मराठी दिनदर्शिका प्रकाशन सोहळा दि.७ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता पुदाले मोटर ड्रायव्हिंग स्कूल ऑफिस येथे धाराशिव महिला जिल्हाप्रमुख शामलताई वडणे माजी नगरसेवक कमलाकर चव्हाण अणदूरचे ग्रामपंचायत सदस्य डॉ.जितेंद्र कानडे डॉ.जितेंद्र पाटील शिवसेना महिला तालुका प्रमुख सुरेखा ताई मुळे जेष्ठ पत्रकार विलास येडगे माजी नगरसेवक विनायक अहंकारी खरेदी विक्री संघाचे





अध्यक्ष सुनील जाधव सरदार सिंग ठाकूर नळदुर्ग शहर प्रमुख संतोष पुदाले या मान्यवराच्या हस्ते शिवनेरी मराठी दिनदर्शिका प्रकाशन सोहळा करण्यात आले या कार्यक्रमात नळदुर्ग शहरातील सामाजिक कार्यकर्ते माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांचा वाढदिवस निमित्त शिवसेनेच्या वतीने सत्कार करण्यात आला तसेच महिला आघाडीच्या तालुकाप्रमुख सुरेखाताई मुळे यांना पुणे येथील वाय. के. फाऊंडेशन या संस्थेचा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा नळदुर्ग शहर शिवसेनेच्या वतीने शहर प्रमुख संतोष पुदाले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला तसेच तुळजापूर तालुका खरेदी विक्री संघाच्या अध्यक्षपदी सुनील जाधव यांची निवड झाल्याबद्दल कमलाकर चव्हाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात त्याचबरोबर तालुक्यातील आलेल्या सर्व शिवसैनिक व पदाधिकाऱ्यांचे गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी कमलाकर चव्हाण शामल ताई वडणे विनायक अहंकारी जितेंद्र कानडे सुरेखा ताई मुळे आपले मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाम माळी केले तर सुत्रसंचलन नेताजी महाबोले यांनी केले या कार्यक्रम साठी माजी तालुकाप्रमुख बाळकृष्ण घोडके कष्णात मोरे राजेंद्र जाधव (मेंजर) अनिल छात्रे सावकार यशवंत पाटील बलीमनशट्टी अमोल वगुले दता भोसले संतोष मोटे सुरज साळुंके दगडू नाना शिंदे शाम कनकधर सोमनाथ म्हेत्रे भिमा कोळी नेताजी महाबोले चंद सगरे पप्पू पवार मंजुषा महाबोले कविता कलशेट्टी सर्व शिवसैनिक उपदाधिकारी उपस्थित होते तर या कार्यक्रमाचे आभार सरदार सिंग ठाकूर यांनी केली

## खेड पंचायत समिती कडून टेकवडी गावात नांदेड पॅटन शोष खड्डे प्रशिक्षण संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी डॉ. देवेंद्र ओहाळ**
**खेड तालुका.**

टेकवडी गावामध्ये नांदेड पॅटर्न शोषखड्डे प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले त्यामध्ये गावातील मंडळींनी अतिश चांगला प्रतिसाद दिला . शोषखड्डे घेऊन घरातील सांडपाणी त्यामध्ये सोडले जाऊन ते जमिनीचं मुरून दिले जाते त्यामुळे जे डास , माशा चे प्रमाण कमी होऊन आपण बरेच आजारांपासून लांब राहू शकतो. आणि जमिनीतील पाण्याची पातळीही वाढते. काल या शिबिराचे आयोजन मार्गदर्शन मा. श्री. विशाल शिंदे साहेब. ( गट विकास अधिकारी पंचायत समिती खेड. ). मा. श्री. एस. टी. भोकटे साहेब( विस्तार अधिकारी पंचायत समिती खेड) यांनी गावातील ग्रामस्थांना अतिश सुंदर माहिती दिली तसेच शासनाचा योजनाची माहिती दिली त्या योजनाच लाभ गावातील शेतकऱ्यांना कशा प्रकारे घेता येईल याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच विशेष सहकार्य करण्यासाठी मा. श्री. लखन रेडेकर साहेब.( म. ग्रा. रो. हमी योजना तांत्रिक अधिकारी) . मा. श्री. एम. पी. दवणे




व देविदास विश्वास.( ग्रामपंचायत अधिकारी ) यांचे विशेष सहकार्य लाभले. ग्रामपंचायत टेकवडीचा वतीने अधिकारी वर्गाचा सन्मान करण्यात आला.

## पिंपळस( रामाचे) येथिल जिल्हा परिषद शाळेत सूर्यनमस्कार उपक्रम उत्साहात .

**दैनिक युवक आधार**
**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक**
**विनोद गायकवाड**
**(क्रीडा सह्याद्री फाउंडेशन निफाड आयोजित)**

**निफाड (जि. नाशिक) :** प्रभू श्रीराम नवमी महोत्सवानिमित्त व क्रीडा सह्याद्री फाउंडेशन आयोजित सामूहिक सूर्यनमस्कार व योगासने जि. प. प्राथमिक शाळा पिंपळस (रामाचे)च्या प्रांगणात उत्साहात संपन्न झाले. त्यामध्ये शाळेतील 359 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. याप्रसंगी शाळेच्या, मुख्याध्यापक राजेंद्र दुसाने यांनी विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. जीवनामध्ये सूर्यनमस्कार व योगा किती महत्त्वाचा आहे याबद्दल सरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून विलास गायकवाड यांनी काम पाहिले. त्यांनी विद्यार्थ्यांकडून ५१ सामूहिक सूर्यनमस्कार व योगासने करून घेतले. उपक्रम यशस्वी करण्याकरिता , शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र दुसाने,नवनाथ बटवल,मनोज दलाल,दिनेश पाटील,पोपट मोरे,प्रदीप पालवी उपशिक्षिका,लता जाधव,शीला कसबेकर,माधुरी सोनवणे,पल्लवी भडके,रंजना पैठणकर,जयश्री मोरे,मयुरी पंडित आदी उपशिक्षिका ,पिंपळस रामाचे सरपंच ,उपसरपंच ,एसएमसी अध्यक्ष ,उपाध्यक्ष ,सदस्य व पालक उपस्थित होते यावेळी पि. ए .मोरे यांनी सूत्रसंचलन केले. शिव अविष्कार स्पोर्ट्स फाऊंडेशनचे क्रीडा सह्याद्री फाउंडेशनचे अध्यक्ष,विलास गायकवाड यांचेही या उपक्रमासाठी मार्गदर्शन लाभले.



## वाशिम जिल्हा रुग्णालयात सुविधाचा अभाव-राम इढोळे पाटिल

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

असंख्य गाव व खेडे जोडलेला या वाशिम जिल्हा रुग्णालयात हजारो रुग्ण चांगल्या आरोग्य सुविधा मिळण्याच्या प्रतीक्षेत वाशिम जिल्हा रुग्णालयात चांगल्या आरोग्य सुविधा मिळण्यासाठी रुग्ण आशेची हाक देत आहे, पण याउलट या वाशिम जिल्हा रुग्णालयात रुग्णांची गैरसोय होत आहे. खेड्यापाड्यातून दूर दुरून वाशिम जिल्हा रुग्णालयात आपल्याला चांगल्या व योग्य ते आरोग्य सुविधा मिळेल या आशेने रुग्ण जिल्हा रुग्णालयात धाव घेतो परंतु तिथे अक्षरशः रुग्णाशी गैरवर्तुळुक व आरोग्य सुविधाचा अभाव दिसून येत आहे मी सोता हा अनुभव घेतला आहे. मी रुग्ण या नात्याने दिनांक ८ एप्रिल २०२५ रोजी वाशिम जिल्हा रुग्णालया त उपचार करण्यासाठी गेलो असता आमच्याकडे एम आर आय मिशन उपलब्ध नाही आहे असे सांगण्यात आले तुमच्याकडून काय कारवाई होते

ते तुम्ही करू शकता असे स्पष्ट बोलणे डॉक्टरांकडून सांगितले गेले यावरून स्पष्ट दिसत आहे, की एवढे मोठे जिल्हा रुग्णालय तेथे अजून एमआरआय मशीन उपलब्ध नाही आहे, चांगले तज्ञ डॉक्टर सुद्धा नाही आहे अशा त-हेने बरेचश्या असुविधा तिथे आढळून येत आहे. नेमके जिल्हा रुग्णालय आहे की रुग्णालयाचा मुखडा धारण केला आहे हे कळत नाही आहे, आरोग्य विभाग व लोक प्रतिनिधी गाळ झोपी गेला आहे की काय हा प्रश्न शेतकरी राम इढोळे यांनी उपस्थित केला आहे. रुग्णाचा जीव गेल्यानंतर सुविधा उपलब्ध होतील की काय असे निराशा जनक उदगार त्यांनी व्यक्त केली खरोखर लोकप्रतिनिधी यांना देखील गव्हर्मेंट रुग्णालया व्यतिरिक्त कुठेही स्टेटमेंट दिल्या गेली नाही पाहिजे तेव्हाच कुठेतरी गव्हर्मेंट रुग्णालयाचा कायापालट होणार नाहीतर गोरमेंट रुग्णालय केवळ फक्त शोभेची वस्तू म्हणून राहील, असे मत त्यांनी व्यक्त केली आरोग्य विभागाने व सरकारने गव्हर्मेंट रुग्णालयाकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. गरजू रुग्णाचा वाली कोण होणार सरकार मायबाप याकडे लक्ष असू द्या वाशिम जिल्हा हा आधीपासूनच असंख्य सुविधा पासून वंचित राहिलेला जिल्हा आहे याकडे लक्ष असू द्यावे राम इढोळे पाटिल..

# रेवदंडा बाजारपेठेत ताडगोळा विक्रीतून स्थानिकांना मिळतोय चांगला रोजगार

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**


उन्हाळी फळ असलेल्या ताडगोळ्याला "आईस ऍपल" संबोधले जाते. पांढरेशुभ्र फळ, रसदार गर आणि चवीला गोड असलेले ताडगोळे ग्राहकांना भुरळ पाडत आहेत. उन्हाळ्यात ताडगोळ्यांचे सेवन शरीरासाठी लाभदायक असल्याने सध्या फळे खरेदी करण्यासाठी ग्राहक गर्दी करत असल्याचे विक्रेत्यांकडून सांगितले जात आहे. ताज्या ताडगोळ्यांची वाढती मागणी पाहता अनेक स्थानिक युवकांनी याचा व्यवसाय सुरू केला असून, त्यातून त्यांना चांगले उत्पन्न मिळू लागले आहे.गावांपासून शहरांपर्यंत ताडगोळ्याचे स्टॉल्स ठिकठिकाणी दिसून येत आहेत. दररोज शंभर ते दोनशे ताडगोळ्यांची विक्री सहज होते. त्यामुळे एका विक्रेत्याला दिवसाला ₹1000 ते ₹3000 पर्यंतचे उत्पन्न मिळत आहे. ही सहज

> रेवदंडा चौल मध्ये आम्ही गेल्या चार ते पाच वर्षांपासून ताडगोळे विक्री व्यवसायात कार्यरत आहोत. आम्ही ताडगोळे विक्री करून आमचा उदरनिर्वाह करतो. फळे आणून त्यांची विक्री करेपर्यंत मोठी मेहनत करावी लागते. मात्र याच्या विक्रीतून आम्हाला चांगला नफा मिळवता येतो.
>
> **विक्रेता सुरेश मिसाळ,हुपेंद्र पाटील**

उपलब्ध होणारी फळे जास्त खर्च न करता विक्रीस आणता येतात, म्हणून हा व्यवसाय अल्प भांडवलात सुरू करता येतो. ताडाच्या झाडावर उन्हाळ्याच्या हंगामात येणारी ही फळे चवीला गोड असून यामध्ये व्हिटॅमिन सी, खनिज आणि लोह असल्यामुळे याच्या सेवनाने रोगप्रतिकारक शक्ती वाढते. समुद्र किनारपट्टी भागामध्ये याचे उत्पादन घेतले जाते. अलिबाग तालुक्यात ताडाची झाडे मुबलक प्रमाणात उपलब्ध असून मुंबई, पुणे,नाशिक भागात या

> ताडगोळे चवीला चांगले लागत असून उन्हाळ्यात याचे सेवन शरीरासाठी लाभदायक आहे. याच्या सेवनामुळे उष्माघात सारख्या समस्येवर नियंत्रण मिळवता येते. रेवदंडा चौल सारख्या गावात ताडगोळे स्वस्त दरात मिळत असून ताजी फळे उपलब्ध असल्यामुळे आम्ही प्रत्येक फेरीला फळांची खरेदी करतो.
>
> **प्रांजल, शुभांगी गायकर, शौर्या,शितल माळी ग्राहक.**

फळांना चांगली मागणी आहे. ताडगोळा हा शरीराला ऊर्जा देणारा, थंडावा देणारा आणि नैसर्गिक पदार्थ असल्यामुळे त्याचे आरोग्यदायी फायदेही मोठे आहेत. त्यामुळे ग्राहकांचा कल अधिक प्रमाणात या फळाकडे वळताना दिसत आहे.या व्यवसायाला शासनाने थोडे मार्गदर्शन आणि सहकार्य दिल्यास ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होऊ शकतो.



# "ग्रामदरबारात" आ. बबनराव लोणीकर यांनी दिला जनतेच्या प्रश्नांना न्याय

**– दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी गोविंद थोरात, आष्टी**

महाराष्ट्र शासनाच्या "शासन आपल्या दारी" या उपक्रमांतर्गत आज दिनांक 9 एप्रिल 2025 रोजी आष्टी येथे भव्य जनता दरबार आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात परतूर-मंठा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रत्यक्ष हजेरी लावून ग्रामस्थांच्या अडी-अडचणींवर थेट संवाद साधला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या उपक्रमामुळे गावपातळीवरील समस्या थेट शासन दरबारी पोहोचवून तत्काळ तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. यावेळी 27 विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी झाले. या संवादमधून महात्मा फुले जनआरोग्य योजना, आयुष्मान भारत, मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष यांच्या माध्यमातून आरोग्यावरील मोफत शस्त्रक्रिया योजनेची माहिती देण्यात आली. किसान कार्ड, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना अंतर्गत शेतकऱ्यांना रोटावेटर, आधुनिक शेती उपकरणे, मोफत वीज यांचा लाभ घेण्याचे आवाहन आमदार लोणीकर यांनी केले. तसेच मोदी आवास योजना, अहिल्याबाई होळकर घरकुल योजना, यशवंतराव चव्हाण घरकुल योजना यासारख्या योजनांसाठी मोफत वाळू मिळावी यासाठी अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. त्यांनी सांगितले की, परतूर-मंठा मतदारसंघात आतापर्यंत तब्बल 15,000 घरकुले मंजूर करण्यात आले असून, ती यशस्वीपणे पूर्णही झाली आहेत. महिला बचत गट, लाडकी बहीण योजना, सुकन्या योजना अशा महिलांसाठीच्या कल्याणकारी योजनांची माहितीही यावेळी देण्यात आली. या ग्रामदरबार उपक्रमामुळे शासन आणि जनता यांच्यातील दरी कमी होऊन विकासाचा मार्ग अधिक सुलभ होईल, असा विश्वास आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला. ग्रामस्थांनीही या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले.



# कु.देवश्री प्रशांत शेडगे हिचा विदेशात डंका

## कंप्युटर क्राऊड मध्ये मास्टर करून पनवेल च्या शिरपेचात खोवला मानाचा तुरा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल् (प्रतिनिधी)**

पनवेल तालुका प्रेस क्लब चे अध्यक्ष प्रशांत शेडगे यांची कन्या कु.देवश्री प्रशांत शेडगे ही गेले वर्षभर आयरलंड येथे कंप्युटर क्राऊड मास्टर च्या उच्च शिक्षणासाठी गेले वर्षभर वास्तव्यास होती.अनुकूल परिस्थिती मद्धे शिक्षण घेत पदवी प्राप्त करून पनवेल च्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून समाजातील सर्व स्थरातून कु. देवश्री वर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पनवेल येथे पिल्लई महविद्यालयात कंप्युटर सायन्स चे शिक्षण पूर्ण केल्यावर अजून पुढचं शिक्षण करण्याची जिद्द उराशी बाळगून परदेशात शिक्षण घेण्यासाठी प्रचंड परिश्रम करून आयर्लंड येथील डब्लीन युनिवरसिटी मद्धे क्राऊड कॉम्प्युटरसाठी प्रवेश घेतला.त्या नंतर कठोर परिश्रम करत मास्टर डिग्री संपादन करून परिवाराचे स्वप्न साकार केले. हे आनंदाचे वृत्त समजताच तिच्या वर कौतुकाचा वर्षाव होत असून मा. सभागृह नेते परेश ठाकूर आणि समाजातील इतर प्रतिष्ठित व्यक्तींकडून तिचे अभिनंदन करण्यात येत आहे.



# जनार्दन सरोदे पाटील यांची रिसोड तालुकाध्यक्ष पदी निवड..

## (माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समिती )

**दैनिक युवक आधार**
**वाशिम जिल्हा/ प्रतिनिधी**
**करण धोंगडे**




माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समिती आणि पोलीस मित्र फाउंडेशन संचलित माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे वाशिम जिल्हा संघटक तथा सांध्य दै.उज्वल मालेगाव प्रतिनिधी करण धोंगडे यांच्या शिफारशीनुसार समितीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष महेश सारणीकर साहेब यांच्याकडून जनार्दन सरोदे पाटील यांची रिसोड तालुकाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आलेली आहे.त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेउन युवा व धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते सरोदे पाटील यांनी इतर अपेक्षित घटकांना न्याय देण्याच्या दृष्टीने त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव या नात्याने त्यांना माहिती अधिकार रिसोड तालुकाध्यक्ष या पदावर नियुक्ती दिल्याने त्यांच्यावर तालुक्यातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे, अशावेळी समितीतील युवा पदाधिकाऱ्याला संधी मिळणे आणि त्यातच त्याने संधीचे सोने करणे याला योगायोग म्हणावा लागेल,अपेक्षित घटकांची ठिकठिकाणी होत असलेली गळचेपी थांबवण्यासाठी त्यांना योग्य न्याय देण्यासाठी व त्यांचे प्रश्न वेळोवेळी मार्गी लावण्यासाठी समितीच्या संघटनात्मक कार्यासाठी त्यांनी रिसोड तालुक्यात काम करावे असे नियुक्तीपत्र समितीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष महेश सारणीकर यांच्या उपस्थितीत मराठवाडा विभाग प्रमुख राजू शिंदे,गोपाल बोरकर शहराध्यक्ष रिसोड व वाशिम तालुकाध्यक्ष तथा सांध्य दै.उज्वल मालेगाव वाशिम तालुकाध्यक्ष गजानन पवार पाटील वाशिम जिल्हा संघटक करण धोंगडे यांच्या शिफारशी नुसार जनार्दन सरोदे पाटील यांना रिसोड तालुकाध्यक्षपद देण्यात आले.

# वाशीम जिल्ह्याची वाढली शान {सीएस} चा झाला मुंबईत सन्मान. आरोग्य मंत्री प्रकाश आंबिटकर यांच्या हस्ते डॉ अनिल कावरखे यांना पुरस्कार प्रदान..

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा वाशिम /प्रतिनिधी**
**गजानन पवार**

राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांतर्गत अलोकिक उल्लेखनीय कामगिरी करत वाशीमचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ अनिल कावरखे, यांनी राज्यात एक दोन वेळा नव्हे तर तब्बल पाच वेळा अव्वल स्थान पटकावले आहे.एप्रिल २०२४ ते जानेवारी २०२५.या दहा महिन्यांच्या कालावधीत केलेल्या कार्याचे मूल्यमापन करण्यात आले. त्यानुसार त्यांना राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आंबिटकर यांनी पुरस्कार देऊन डॉ अनिल कावरखे यांना मुंबई येथे सन्मानित केले. यावेळी त्यांच्या सोबत जिल्हा सामान्य रुग्णालयाचे डॉ अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. डॉ कावरखे यांनी जिल्हा शल्य चिकित्सक पदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर सरकारी रुग्णलयांमध्ये बदल घडवून आणण्याचा ध्यास घेतला. वरिष्ठांचे मार्गदर्शन सहकार्याने नियोजपूर्वक अंमलबजावणी करत त्यांनी




सरकारी रुग्णालयाचा दर्जा उंचावला आरोग्य सेवा सर्व सामान्यांपर्यंत पोहचवण्यावर त्यांनी विशेष भर दिला. नियम बद्ध अंमलबजावणी डॉ व कर्मचाऱ्यासी योग्य अणि आधुनिक वैद्यकीय सुविधा यांचा प्रभावी वापर करत जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेला नवे बळ दिले. राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत ३०. विविध निर्देश्यंकाच्या आधारे जिल्ह्याचे मूल्यमापन करण्यात आले.यामध्ये मातृ आरोग्य, बाल आरोग्य, कुटुंब नियोजन, यासारख्या घटकाचा समावेश होता. मागील दहा महिन्यात राज्यभरात पडताळणी केल्यानंतर जिल्हा शल्य चिकित्सक सवर्गातूंन वाशिम तब्बल पाच वेळा अव्वल ठरला. डॉ अनिल कावरखे यांच्या या कार्याचा गुणगौरव मुंबई येथे सन्मानपत्र देऊन करण्यात आला..

# संविधानाचा सन्मान आणि जागृतीसाठी भव्य रॅली यवतमाळमध्ये संपन्न!

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:**
**-जितेंद्र खोडे**
**यवतमाळ,**
दि.9 एप्रिल.

दिनांक ८ एप्रिल (मंगळवार) रोजी समता पर्व प्रतिष्ठान यवतमाळच्या वतीने, अडव्होकेट सीमा तेलंगे यांच्या मार्गदर्शनात "संविधान सन्मान रॅली" चे आयोजन करण्यात आले. ही रॅली समता मैदान येथून सुरू होऊन हनुमान आखाडा,सिटी पोलीस स्टेशन, संविधान चौक,जिल्हा सत्र न्यायालय आणि पुन्हा समता मैदान इथपर्यंत भव्य स्वरूपात पार पडली. रॅलीत विविध पोस्टर,पथनाट्य,आणि दृश्य सादरीकरणांच्या माध्यमातून संविधानाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.यामध्ये सर्व नर्सिंग कॉलेजेस, सावित्रीबाई फुले समाजकार्य महाविद्यालय,तसेच हजारो युवकांचा उत्स्फूर्त सहभाग होता. छोट्या चिमुकल्यांच्या लेझीम पथकांनी रॅलीला वेगळाच रंग दिला.विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,जिजाऊ माँसाहेब आणि माता रमाई यांच्या भूमिका साकारून समाजप्रबोधनाचं कार्य केलं.

या यशस्वी उपक्रमासाठी रॅलीचे मुख्य संयोजक कॉम्रेड सचिन मनवर,कृष्णा पुसनाके,प्रा.घनश्याम दरणे,प्रा.अंकुश वाकडे,नितेश मेश्राम,हेमंत कांबळे,नारायण थुल,प्रमोदिनी रामटेके,माधुरी वाळके,भाग्यश्री खडसे,शुभम वाळके,स्नेहल रेचे,ज्योती जीवने,प्रा.पंढरी पाठे,विनय मिरासे,आणि समता पर्व प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांनी विशेष प्रयत्न केले.




# नवकार जाप,रुग्णाना फल वाटप करुण महावीर जयंती कार्यक्रमला सुरवात

**दैनिक युवक आधार**
**अमरावती विभागीय संपादक.**
**संदीप मापारी (लोणार).**

जैन समुदायासाठी महावीर जयंती अत्यंत महत्त्वाची असते. हा दिवस ते जैन धर्माचे महान तीर्थंकर यांचा जन्मदिवस म्हणून साजरा करतात. ते शुक्ल पक्षामध्ये चैत्र महिन्याच्या तेराव्या दिवशी जन्मले होते. जैन धर्मातील महान तीर्थंकराचा जन्मदिवस म्हणून महावीर जयंती साजरी केली जाते. ते जैन धर्माचा प्रचार करणारे शिक्षक म्हणून ओळखले जातात. जगाला 'जिओ और जिने दो'चा संदेश देणाऱ्या भगवान महावीर यांची जयंती हा दिवस 10 एप्रिल 2025 रोजी साजरा केला जाणार आहे. जैन धर्मात अहिंसा ला फार महत्व आहे,रुग्ण सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे असे प्रतिपादन यावेळी लोणार तहसील च्या नायब तहसीलदार परीलकर मैडम यांनी केले लोणार शहरात महावीर जयंती निमित्त जैन समाजकडून विविध कार्यक्रमाचे आयोजन करन्यात आलेले आहे त्याचाच भाग म्हणून जैन सहेली सोशल ग्रुप कडुन ग्रामीण रुग्णालय येथे रुग्णना फल व बिस्किट वाटप केले या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिति म्हणून लोणार तहसील च्या नायब




तहसीलदार परीलकर मैडम, डॉक्टर मापारी मैडम, डॉक्टर नागरे मैडम,डॉक्टर निखिल अग्रवाल, प्रेम सिंघी,सतीश गेलडा,प्रमोद राखा होते, नुकतेच जैन सहेली सोशल ग्रुप ने गौरक्षनात जाऊंन गौ माता ची सेवा करूंन गुडिपाडवा साजरा केला,जैन सहेली सोशल ग्रुप चा मुख्य हेतु समाजउपयोगी कार्य करने, जनसेवा करने आहे यावेली रुग्णालय ला एक पाण्यसाठी माठ सहेली ग्रुप कडून भेट स्वरूप दैन्यात येइल असे सांगन्यात आले, यावेली बहुसंख्य हॉस्पिटल कर्मचारी वर्ग उपस्थित होता कार्यक्रम यशस्वी साठी जैन सहेली सोशल ग्रुप च्या श्वेता सिंगी, स्मिता राका, नंदा संचेती, प्रिया लुनिया, प्रीती संचेती प्रज्ञा राका, सारिका रेदासनी, पुनम रुणवाल , ममता गेलडा, ,श्रुती बोरा,, नूतन बेदमुथा, सपना गेलडा, शोभा राका, सीमा घेरवरा. यांनी परिश्रम घेतले

# भातकुडगाव केंद्र शाळेचे विविध परीक्षेत अभूतपूर्व यश

भातकुडगाव /प्रतिनिधी

शेवगाव तालुक्यातील भातकुडगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेती पहिली ते चौथी पर्यंतच्या अनेक विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत सहभाग घेतला होता.आत्ताचा पार पडलेल्या एन.बी.त्यालेंट शिष्यवृत्ती, राज्य स्तरीय मंथन शिष्यवृत्ती, जिल्हा परिषद मिशन आरंभ परीक्षा पार पडल्या. यामध्ये शिक्षक व विद्यार्थी यांनी घेतलेल्या परिश्रमाला यश मिळाले. शिक्षक बडधे यांनी परिश्रम घेत सकाळी शाळेच्या वेळेपूर्वी विद्यार्थ्यांचे क्लास घेत मुलांकडून अभ्यास करून घेतला.एन.बी.त्यालेंट शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये तालुक्यातून ५०० विद्यार्थ्यामध्ये सहा विद्यार्थ्यांनी बाजी मारली.त्यामध्ये प्रथम क्रमांक अभिराज पांडुरंग आठरे, द्वितीय क्रमांक कार्तिक एकनाथ भालेराव, तिसरा क्रमांक कार्तिक महेश वडणे, चौथा क्रमांक सुयोग स्वप्नील देवरे, पाचवा क्रमांक रीयांश निवृत्ती जमधडे, सहावा क्रमांक श्रेय विजय वडणे यांनी बाजी मारली तर राज्य स्तरीय मंथन शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये चौथीतील विद्यार्थी प्रथम क्रमांक अभिराज पांडुरंग आठरे, द्वितीय क्रमांक कार्तिक एकनाथ भालेराव, तिसरा क्रमांक रीयांश निवृत्ती जमधडे, चौथा क्रमांक मयूर चंद्रकांत फटांगरे, पाचवा क्रमांक कार्तिक महेश वडणे. दुसरीमधील विद्यार्थी पहिला क्रमांक पल्लवी संतोष गायकवाड, दुसरा क्रमांक आराध्य दीपक फटांगरे, पहिलीतील विद्यार्थी पहिला क्रमांक आराध्य अमोल वडणे, दुसरा क्रमांक आशिया अयाज शेख. तर तिसरी मधील विद्यार्थी पहिला क्रमांक भक्ती अमोल वडणे, दुसरा क्रमांक अंकिता कल्याण साळवे, तिसरा क्रमांक शिवन्या विजय वडणे. तर जिल्हा परिषद मिशन आरंभ परीक्षेमाद्ये १०० टक्के निकाल. हि परीक्षा ३०० गुणांची असून त्यामध्ये १५ विद्यार्थ्यांनी २०० पेक्षा अधिक गुण मिळवले आहेत. यामध्ये प्रथम कार्तिक महेश वडणे २३६ गुण, दुसरा अभिराज पांडुरंग आठरे २३४ गुण, तिसरा कार्तिक एकनाथ भालेराव २३० गुण, चौथा तेजस दत्तात्रय फटांगरे २२६ गुण, पाचवी श्रेय विजय वडणे २२२ गुण, सहावा रीयांश निवृत्ती जमधडे २१८ गुण मिळवले. या यशासाठी मुख्याध्यापक व वर्गशिक्षीका गव्हाणे , शिक्षक बडधे , तेलुरे ,सूर्यावशी यांनी मेहनत घेतली. गटशिक्षणाधिकारी तृप्ती कोलते, शिक्षण विस्तार अधिकारी शंकर गाढेकर, केंद्रप्रमुख ननवरे , शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सरपंच, उपसरपंच,सर्व सदस्य व पालक वर्गाकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# आंबेडकरी बाप "हे आंबेडकरी साहित्यातील एक मौलाचा दगड ठरणारे पुस्तक आहे.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी वार्ताहर**

दिनेश हुमणे, डोंबिवली यांजकडून, डॉ. प्रदिप आगलावे सुप्रसिध्द ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत समाजात परिवर्तन घडवुन आणण्यासाठी " आंबेडकरी बाप " हे पुस्तक अत्यंत महत्वाचे असुन आंबेडकरी साहित्यातील हे पुस्तक एक मौलाचा दगड ठरणार असल्याचे महाराष्ट्र राज्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र व साधने प्रकाशन समिती सदस्य सचिव, ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत प्रदीप आगलावे प्रतिपादले. प्रा. शुक्राचार्य गायकवाड, सुमेरू प्रकाशन डोंबिवली यांचे आंबेडकरी बाप हे 60 वे पुस्तक प्रकाशन सोहळा सर्व्हेश हॉल डोंबिवली येथे एतेहासीक दस्तऐवज स्वरूपाचे प्रकाशन या स्वरूपात मुंबई म.न.पा.चे नगर अभियंता महेंद्र उबाळे यांच्या हस्ते पार पाडला. अध्यक्षस्थानी प्रा. प्रदीप आगलावे सदस्य. सचिव डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र राज्य .प्रमुख पाहुणे म्हणुन समाजभुषण केशव भोईर, साहित्यिक विचारवंत डी. टी. गायकवाड, दामोदर मोरे तर दैनिक वृत्तरत्न सम्राटचे कार्यकारी संपादक कुणाल बबन कांबळे, प्रमुख वक्ते म्हणुन सुप्रसिध्द साहित्यिक विचारवंत भरत शिरसाठ हे उपस्थित होते. या प्रसंगी समाजातील विविध स्तरावरील मान्यवर, पुस्तक प्रेमी,उपासक,उपासिका यांच्या उपस्थितीने सर्व्हेश हॉल खच्चुन




भरला होता.सुत्रसंचलन,समाधान मोरे तर, आभार प्रदर्शन प्रा.संदेश शुक्राचार्य गायकवाड यांनी आपल्या ओझरत्या वाणीत केले. सदरप्रसंगी प्रमुख पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तत्पूर्वी मान्यवरांच्या हस्ते तथागतांच्या मूर्तीला व बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्प व पुष्पमाला अर्पण करून मेणबत्तीचे प्रज्वलन करण्यात आले. डॉ. सिद्धार्थ मोरे व वृषाली करलाद यांनी सुरेल आवाजात भिमगीते गाऊन उपस्थितांची मने हेलावली. उपस्थित प्रमुख पाहुणे मान्यवरांचा यथोचीत सत्कार करून त्यांना व आंबेडकरी बाप या पुस्तकातील मान्यवर लेखक डॉ.यशवंत मनोहर, डॉ.प्रदिप आगलावे, ज.वी.पवार, उषा भास्कर काळे, दीपश्री माने बलखंडे, प्रभाकर थोरात, दामोदर मोरे,धनराज डाहाट, सिताराम गायकवाड, उत्तम भगत, इंदुताई बोरकर, रमेश जाधव, जगदेव भटटु, ॲड.धम्मकिरण चन्ने, डॉ. सुरेंद्र राजाराम शिंदे, भिमराव रायभोळे, सुनिल पवार, बी. डी. जाधव, विदया भोरजारे, कांतीलाल भडांगे, शांताराम निकम, प्रभाकर गवाणकर, प्रा. भरत शिरसाठ, रेखा किशोर कांबळे, सुरेश साबळे, चंद्रकांत पोळ, कडुबा बनसोडे, आय.एम. मोरे, नारायण जाधव येळगावकर, प्रदिप जाधव, डॉ. सिध्दार्थ मोरे, सुनिता इंगळे, प्रा.विजय मोहिते, किरण सोनावणे, प्रा. डॉ.विठ्ठल शिंदे शिंदे या 35 लेखकांना स्मृती चिन्ह ,आंबेडकरी बाप या पुस्तकाची एक प्रत देऊन सन्मानीत करण्यात आले. अध्यक्षस्थानावरून पुढे बोलताना प्रा.आगलावे सर म्हणाले आंबेडकरी विचारांची चळवळ प्रभावीत होण्यासाठी विचाराला खतपाणी घालावे लागते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार समाजमनावर रूजवण्यासाठी साहित्यिकांनी प्रयत्न केला पाहिजे. आंबेडकरी बाप हे पुस्तक आंबेडकरी विचारांची जाणीव ठेवुन नव्या साहित्याला जन्म देत असुन पुढील पिढीत आंबेडकरी विचारधारा जिवंत ठेवुन संक्रमीक करणारे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ग्रथांच्या विचारांवर चिंतन करून त्यानुसार (मॅनीफेस्टा) कार्यक्रमाचा जाहिरनामा करून क्रांती घडवुन आणावी हि वाटचाल असली पाहिजे. आदर्श बाप कोण हे नव्या पिढीला माहित झाले पाहिजे असे उपस्थितांशी आवाहन केले. ज्येष्ठ साहित्यिक दामोदर मोरे सरांनी आंबेडकरी बाप हे शीर्षकच ऊर्जा देणारे पॉवरहाउस आहे. ते आंबेडकरी निष्ठेचे बावनकशी आंबेडकरी सोन आहे.आंबेडकरी बापांची अनेक रूपे या पुस्तकातुन पाहावयास मिळतील तेव्हा आंबेडकरी वैचारीक मुल्यांचा अभ्यास होवुन आंबेडकरी बाप असलेल्या योध्दांचे शब्दबध्द होवुन काही आंबेडकरी बाप शोधुन त्यांनाही इतिहासबध्द केले पाहिजे. प्रा. शुक्राचार्य गायकवाड यांनी आंबेडकरी आई आली म्हणुन मी आंबेडकरी बाप हे पुस्तक काढले असे नसुन, आई असेल तर, बाप आहे अन बाप असेल तर,आई हि देखील आहे. आम्हाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरी चळवळीत कार्य करून पुढील पिढीला संक्रमीत केलेल्या या दोन्ही योध्दांच्या कामगीरीचा सार्थ अभिमान असुन त्यांचा एतेहासीक दस्तएवज लिपीबध्द करण्याचे हे काम केवळ आईनेच नव्हे तर आंबेडकरी बाप आल्याने पूर्ण झाले असं मला वाटते.असे स्पष्टीकरण देऊन उपस्थितांची दाद मिळवीली. दैनिक सम्राटचे कार्यकारी संपादक कुणाल कांबळे यांनी माझे वडिल गेल्यावर मला बाप कळाला असे सांगताच उपस्थितांना कुणालमध्ये कालकथीत बबनराव कांबळे साहेबांची छबी जाणवुन,भावना अनावर होवुन, त्यांना आपले अश्रु अनावर झाले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या सर्वांचेच बाप आहेत. असे कुणाल कांबळे यांनी जाहिरपणे ठणकावुन सांगीतले. प्रा. भरत शिरसाट यांनी तुफानी चौकार षटकारांची टोले बाजी करीत आंबेडकरी बाप हे शिर्षक कसे ससमर्पक आहे याची मुक्त उधळण करीत वंचींताचा, शोषितांचा तू सूर्याचाही बाप असल्याचे सांगुन श्रोते मनावर अभिराज्य केले. प्रा. शुक्राचार्य गायकवाड यांचे आंबेडकरी बाप हे पुस्तक त्यांच्या लेखणीच्या बळावर नविन पिढीला संक्रमीत करणार असल्याचे सांगीतले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजकांनी अथक परिश्रम घेतले.

# पारंपारिक वारसा जपत दादर गावात भरते जत्रा

दैनिक युवक आधार
उरण प्रतिनिधी /हेमाली पाटील
दि. 09 एप्रिल

पेण तालुक्यातील नेहमीच चर्चेत असणाऱ्या दादर गावात दिनांक 07 व 08 एप्रिल रोजी भव्य दिव्य अशी जत्रा संपन्न झाली. आई गावदेवी माता व बहिरीदेव महाराजांची जत्रा दरवर्षी दादर गावात भरली जाते.सारे भक्तगण वर्षभर या दिवसाची आतुरतेने वाट पाहत असतात. चैत्र शुद्ध दशमी च्या मंगलमय दिनी गावदेवी मातेला व कालभैरव देवाला मानपान देऊन सर्व ग्रामस्थ इडा पिडा टळण्यासाठी देवीला साकडं घालतात. बहिरीदेवाचा लेपा (पालखी ) ढोल ताशाच्या गजरात, गुलाल उडवीत गावभर फिरवली जातात. घरोघरी पालखीचे आगमन होते.गावकरी मोठ्या आनंदाने स्वागत करत असतात. या दादर गावात कमीत कमी वीस ते पंचवीस लहान मोठी सर्व देव देवतांची मंदिरे आहेत. प्रत्येक आळीत मंदिर असल्याकारणाने घरोघरी स्पिकरच्या माध्यमाने लहान मोठी मंडळी नाचत असतात. संपूर्ण गाव भक्तिमय आवाजात दुमदुमत होता. विविध प्रकारची दुकाने,पाळणी, खाऊची दुकाने विद्युत रोषणाई, पाहुणे, गावकरी या साऱ्यांनी जत्रा सजलेली होती.तरुण मुला-मुलींची अफाट गर्दी पाहायला मिळाली. पेण तालुक्यातील दादर हे लोकसंख्येच्या दृष्टीने मोठं गाव आहे. समुद्राच्या खाडीवर आपले उदरनिर्वाह करणारे हे ग्रामस्थ कष्टकरी, शेतकरी आहेत. पुर्वी उत्पन्नाचे साधन म्हणून येथील रहिवाशी रेतीचा व्यवसाय (मचवा )करत. आजही काही लोक या पारंपारीक व्यवसायाला आपले दैवत मानतात.आणि म्हणूनच पिढ्यानपिढ्या चालत आलेली परंपरा येथील जनतेने आपल्या पोशाखातून दर्शवली. जत्रेच्या निमित्ताने सर्व मुले, पुरुष, वृद्ध कमरेला रुमाल, डोक्यावर कान टोपी आणि टीशर्ट घालतात. तर मुली, स्त्रिया दागदागिने घालून तयार असतात. शिक्षण घेऊन नोकरी निमित्त बाहेर गावी स्थायिक झालेले दादरकर मूळ गावी येऊन आपला आनंद साजरा करतात.अशी माहिती येथील सुजाण नागरिक सौ. सोनाली पाटील व अलंकार पाटील या दाम्पत्यानी दिली.

# सोलर कॅपमुळे ठेले विक्रेत्यांना होणार फायदा

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

निफाड येथिल वैनतेय विद्यालयाच्या इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनी स्नेहा अशोक नागरे आणि गौरी विजय साळुंखे यांनी विद्यालयाच्या अटल टिंकरिंग लॅबमध्ये प्रा. शिरीष पंडित सर यांच्या मार्गदर्शनाखाली ठेले विक्रेत्यांसाठी सौर उर्जेवर चालणारी टोपी तयार केली आहे. या टोपीला "सोलर कॅप" असे नाव दिले गेले आहे, आणि ही सोलर कॅप विक्रेत्यांच्या दृष्टीने फायदेशीर ठरणार असल्याचा दावा करण्यात आला आहे रस्त्यावर ठेले विक्रेते दिवसाढवळ्या प्रचंड उन्हात आणि रात्रीच्या अंधारात विक्री करतात. उन्हामुळे त्यांना तापमानाचा त्रास होतो, आणि अंधारामुळे त्यांना विक्री करताना समस्या भेडसावतात. यावर उपाय म्हणून या विद्यार्थिनींनी शिरीष पंडित सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयाच्या अटल टीकरिंग लॅब मध्ये सोलर कॅप तयार केली या कॅपमध्ये सोलर पॅनेल, लिथियम आयन बॅटरी, एक मिनी फॅन, एलईडी लाइट्स आणि आवाज सहाय्यक यंत्रणा यांचा समावेश आहे, या सोलर कॅप मुळे विक्रेत्यांना उन्हापासून संरक्षण आणि रात्री काम करण्यासाठी आवश्यक प्रकाश मिळतो. या प्रोजेक्टवर २,१४० रुपयांचा खर्च आला असून, हा एक अत्यंत किफायती उपाय ठरतो. एस आय एम स्कूल इनोव्हेशन मॅरेथॉन अंतर्गत या विद्यार्थिनींनी ऑनलाइन पावर पॉइंट प्रेझेंटेशन सादर केले, ज्यात त्यांचा प्रकल्प अत्यंत चांगल्या प्रकारे प्रदर्शित झाला. यावेळी छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा युनिव्हर्सिटीच्या अटल इन्क्युबेशन सेंटरचे सीईओ अमित रंजन यांनी या विद्यार्थिनींच्या या सोलर कॅप प्रोजेक्टचे ऑनलाइन परीक्षण केले व प्रोजेक्ट मधील नाविन्यता व कल्पकता ओळखून त्यांना या प्रकल्पास अधिक प्रभावीपणे ए आय सी अटल (इंक्युबेशन सेंटर) ,छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा युनिव्हर्सिटीत सादर करण्याची संधी दिली या विद्यार्थिनींनी हा प्रकल्प या युनिव्हर्सिटीत सादर केला व उपस्थितांची मने जिंकली यावेळी अटल इन्क्युबेशन सेंटरचे सीईओ अमित रंजन आणि सीओओ वैभव खैरनार यांनी विद्यार्थिनींच्या कामाचे कौतुक केले. त्यांना मार्केटिंगच्या दृष्टीने मार्गदर्शन आणि आर्थिक सहाय्य देण्याचे आश्वासन दिले. याशिवाय, ए आय सी कडून या प्रकल्पासाठी निधी पुरवला जाईल, असेही आश्वासन दिले.असल्याची माहिती मार्गदर्शक शिक्षक प्रा शिरीष पंडित यांनी दिली या विद्यार्थिनींचे व मार्गदर्शक शिक्षकांचे न्या रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे, विश्वस्त अड. ल. जि. उगांवकर, रतन पाटील वडघुले, किरण कापसे, राजेंद्र राठी , अड. दिलीप वाघवकर, राजेश सोनी, प्रभाकर कुयटे , मधुकर राऊत,विश्वास कराड, नरेंद्र नांदे, वैनतेय विद्यालयाचे प्राचार्य बी.आर.सोनवणे, उपप्राचार्या श्रीमती मनीषा गुजराथी , पर्यवेक्षक गुलाब टकले, पर्यवेक्षक बी.बी. गुंजाळ यांनी अभिनंदन केलें (स्नेहा आणि गौरी यांचे हे प्रकल्प केवळ एक शालेय प्रयोग नाही, तर भारतातील लाखो रस्त्यावर ठेले विक्रेत्यांसाठी एक महत्त्वपूर्ण आणि क्रांतिकारी उपाय ठरू शकतो. त्यांच्या या सर्जनशीलतेमुळे विक्रेत्यांचे जीवन सोयीस्कर होईल असा दावा मार्गदर्शक शिक्षक शिरीष पंडित यांनी केला आहे )




अटल टिंकरिंग लॅब ही योजना केंद्र सरकारच्या नीती आयोगाच्या अटल इनोव्हेशन मिशन अंतर्गत राबवली जाते. भारतामध्ये सध्या १०,००० पेक्षा अधिक अटल टिंकरिंग लॅब्स कार्यरत आहेत. या लॅबच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये नवोन्मेष, प्रयोगशीलता, तंत्रज्ञानाची गोडी निर्माण होते तसेच ते सामान्य समस्यांवर उपाय शोधण्याची क्षमता विकसित करतात. या लॅब्समुळे विद्यार्थ्यांना संशोधनासाठी आवश्यक असलेली साधने, तांत्रिक ज्ञान व प्रोत्साहन मिळत असल्यामुळे त्यांच्या संशोधन क्षमतेत लक्षणीय वाढ होत आहे.)

सोलर कॅप सोबत स्नेहा नागरे, गौरी साळुंखे सोबत,अटल इन्क्युबेशन सेंटरचे सीईओ अमित रंजन आणि सीओओ वैभव खैरनार मार्गदर्शक शिक्षक प्रा शिरीष पंडित

# डॉ श्रीकांत पाटील लिखित काळीजकळा कादंबरीचा प्रकाशन सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**कवि सरकार इंगळी**

**वारणानगर** - वारणानगर येथ ५ एप्रिल रोजी स्व. विलासराव कोरे (दादा)यांच्या ३० व्या पुण्यस्मरणार्थ सत्कार्य संवर्धक मंडळ, म. सा. प. शाखा वारणानगर यांच्या विद्यमाने व तात्यासाहेब कोरे वारणा साखर कारखाना यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. श्रीकांत पाटील लिखित काळीजकळा या कादंबरीचा प्रकाशन सोहळा पार पडला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा.विक्रम पाटील (सहाय्यक पोलीस निरीक्षक,कुरळप पोलीस स्टेशन), मा. जयवंट आवटे (कथाकथनकार )उपस्थित होते.कार्यक्रमास वारणा दूध संघ संचालक मा. शिवाजीराव जंगम, मा. माधव उर्फ बाळ गुळवणी (नूतन संचालक वारणा दूध संघ) मा. के. एन. वाले तसेच महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा वारणानगरचे सर्व सदस्य व पदाधिकारी, वारणा समूहातील विविध संस्थांचे संचालक व पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते. प्रथम ग्रंथमित्र प्रा. के. जी. जाधव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. त्यानंतर वारणा विभाग सत्कार्यसंवर्धक मंडळाच्या वतीने आयोजित विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ पार पडला.तर कथाकथनकार जयवंत आवटे यांच्या व इतर मान्यवरांच्या शुभहस्ते कादंबरीचे प्रकाशन झाले.



झाले. काळीजकळा ही कौटुंबिक ओढग्रस्तीची करुण कहाणी असून नातेसंबंधातील संघर्षाचे चित्र यामध्ये लेखकाने अभिव्यक्त केले असून असून स्त्रीला सन्मान देण्याच्या सुतोवाच कादंबरीत लेखकांनी केले असल्याचे प्रतिपादन जयवंत आवटे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पी. बी. बंडगर यांनी केले व आभार मा. चंद्रकांत निकाडे यांनी मानले. कार्यक्रमास महाराष्ट्र साहित्य परिषद वारणानगर शाखचे पदाधिकारी परशराम आंबी, नसिम जमादार, अनिल शिणगारे, प्रा पी बी बंडगर व इतर मान्यवर तसेच परिसरातील ग्रंथालयीन कार्यकर्ते, शिक्षक, विद्यार्थी, पालक बंधू-भगिनी उपस्थित होते.